सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, ०९ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १९८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

**शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीचे पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे भूमिपूजन**

## शिर्डी परिसरातील धार्मिक पर्यटन, आर्थिक विकासाला चालना : नरेंद्र मोदी

शिर्डी, दि.९ -* शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आले. शिर्डी विमानतळाची नवीन टर्मिनल इमारतीमुळे शिर्डी व परिसरातील धार्मिक पर्यटन आणि आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी याप्रसंगी केले.



शिर्डी विमानतळ येथील कार्यक्रमाप्रसंगी महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार आशुतोष काळे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आशिष येरेकर, शिर्डी विमानतळ संचालक गौरव उपश्याम उपस्थित होते.

प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले, शिर्डी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीमुळे साईबाबांच्या भक्तांना सुविधा मिळणार आहेत. यामुळे शिर्डी, शनिशिंगणापूर व आजूबाजूच्या परिसरातील भक्तांच्या संख्येत वाढ होऊन राज्यातील पर्यटन विकासाला चालना मिळेल आणि रोजगाराच्या संधी वाढतील. कार्गो कॉम्प्लेक्समुळे शिर्डी, लासलगाव, अहिल्यानगर व नाशिक परिसरातील कांदा, द्राक्ष, शेवगा, पेरू व डाळींब उत्पादक शेतकऱ्यांचा कृषी माल देश - विदेशात निर्यात होईल, असेही प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

रायगड येथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले , महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्र शासनाचे नेहमीच सहाय्य राहिले आहे. शिर्डीला श्री साईबाबांमुळे आंतरराष्ट्रीय महत्त्व आहे. साईबाबा भक्तांच्या सेवेसाठी शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाची नवीन एकात्मिक टर्मिनल इमारत साकारत आहे. या इमारतीची अंदाजित किंमत ६४५ कोटी रूपये आहे. यामुळे शिर्डी परिसरातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे. ५५ कोटी खर्चून शिर्डी विमानतळावर कार्गो सेवा उभारली जात आहे. यामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

नागपूर येथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बोलतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिर्डी विमानतळावर लवकरच नाईट लँडिंग सुविधा सुरू होणार आहे. शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या या नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीमुळे शिर्डी शहर जगाच्या नकाशावर येणार आहे. येत्या काळात येथे येणाऱ्या साईभक्तांमुळे शिर्डी हे भारतातील सर्वांत जास्त प्रवाशांनी गजबजलेले विमानतळ ठरणार आहे.

यावेळी पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, शिर्डी विमानतळ हे संपूर्ण जिल्ह्याचे आर्थिक विकासाचे मुख्य केंद्र म्हणून नावारूपाला येणार आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विमानतळामुळे शिर्डी एमआयडीसीतील उद्योगांना चालना मिळणार आहे. आजपासून शिर्डी विमानतळाचे नाव 'साईबाबा इंटरनॅशनल एअरपोर्ट' असे नामकरण करण्यात आले आहे, अशी माहितीही पालकमंत्र्यांनी दिली.

## अनाधिकृत बांधकाम प्रकरणी केंब्रिज विद्यालयाच्या सचिवावर गून्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.०९ ऑक्टोबर**

नांदेड- केंब्रिज शाळेचे अनाधिकृत बांधकाम तसेच अनेक गैरव्यवव्हार केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशावरून केंब्रिज विद्यालयाच्या सचिव रेवती गव्हाणे यांच्याविरूद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गून्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा नगरसेवक शेख जाकेर यांनी न्यायालयाल याचिका दाखल केली होती.

कै. रामगोपाल गूप्ता औद्योगीक वसाहतीत ४९/ स्पेबी हा प्लॉट औद्योगिक वापरासाठी गव्हाणे पब्लीकेशनला देण्यात आला होता. परंतू त्यावर बेकायदेशीरपणे केंब्रिज शाळा चालविण्यात येत आहे. त्यातच महापालिकेकडून बांधकाम परवानगी न घेता बांधकाम करण्यात आले. औद्योगिक वसाहत संस्थेकडूनही शाळा चालविण्याची परवानगी घेण्यात आली नाही. या प्रकरणी शेख जाकेर शेख सगीर यांनी महापालिका, जिल्हा परिषद यांच्यासह संबंधीत विभागाकडे तक्रार केली होती. तक्रीरीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत शाळेचे बांधकाम अनाधिकृत तसेच विनापरवानगी शाळा सुरू असल्यचे निषपन्न झाल्यानंतरही कुठलीच कारवाई न केल्याने शेख जाकेर यांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार रेवती गव्हाणे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आगमन व स्वागत

छत्रपती संभाजीनगर दि.९ (जिमाका)- राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आज सकाळी ९:४५ वाजेच्या सुमारास येथील विमानतळावर शासकीय विमानाने आगमन झाले. प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.




विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, महानगरपालिकेचे अपर आयुक्त रणजित पाटील,छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड आदी उपस्थित होते.

## देशातील गरिबांना डिसेंबर २०२८ पर्यंत मोफत धान्य देणार!

नवी दिल्ली : दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने देशातील करोडो गरिबांसाठी डिसेंबर २०२८ पर्यंत प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत मोफत धान्य देण्यास मंजुरी दिली आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. आजच्या कॅबिनेट बैठकीत अनेक योजनांना देखील ग्रीन सिग्नल देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मंत्रिमंडळाने जुलै २०२४ ते डिसेंबर २०२८ पर्यंत प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना आणि इतर कल्याणकारी योजनांतर्गत मोफत तांदळाचा पुरवठा सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. यासाठी लागणारा १७,०८२ कोटी रुपये खर्च केंद्र सरकार करणार आहे.




## रा.स्व. संघ माणूस घडवणारी संघटना दिवाळी अंकासाठी ब्रीद वाक्य घेऊन केली रचना : मिलिंद शेटे

पुणे - तभा वृत्तसेवा दि.९

सांस्कृतिक वार्तापत्र दिवाळी अंक म्हणजे संघ शताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला दिलेली मानवंदना होय असे उदगार सांस्कृतिक वार्तापत्र चे संपादक मिलिंद शेटे यांनी काढले.*सांस्कृतिक वार्तापत्र च्या* कार्यालयात दिवाळी अंकाच्या प्रकाशन प्रसंगी मिलिंद शेटे बोलत होते.ह्या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे रा.स्व.संघ माणूस घडवणारी संघटना हे ब्रीदवाक्य घेऊन अंकाची रचना तीन भागामध्ये केली गेली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये सरसंघचालक हे सर्वोच्च पद आहे. संघाच्या पाच सरसंघचालकांच्या जीवनाचा मागोवा ह्या अंकातील पहिल्या भागात घेतला आहे. त्यांचा व्यवहार सर्वसामान्यांशी किती आत्मियतेचा होता.तसेच ते आपल्या साध्या राहणीतून आणि निर्मळ वागण्यातून कसे जगायचे याचे शिक्षण अतिशय सहजपणे देत असत.हे यातून वाचायला मिळते.दुसऱ्या भागात नव्वद ज्येष्ठ स्वयंसेवकांच्या संघकार्याच्या आठवणीचे संकलन



प्रकाशित केले आहे.शेवटच्या भागात प्रचारक ही कॉन्सेप्ट कशी असते, चालता बोलता संघ म्हणजे संघ प्रचारक तसेच संघात गायिली जाणारे पद्य,संघ - गीते,संघकार्य वाढीमध्ये वहिनींचे योगदान,आणीबाणीत संघाचे योगदान ह्या विषयावर प्रकाश टाकलाआहे.सेवा कार्य,

धर्म जागरण,सामजिक समरसता इ विषयावर तज्ञ व अनुभवी अभ्यासकांचे महत्त्वपूर्ण लेख आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काय आहे हे सांगण्यासाठी समाजामध्ये चालतांना,बोलतांना ह्या अंकाचा सर्वांना उपयोग व्हावा, ह्यासाठी जास्तीत जास्त माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकाशनप्रसंगी ज्येष्ठ प्रचारक व सांस्कृतिक वार्तापत्र चे सल्लागार शशिकांत उर्फ भाऊराव क्षीरसागर,संपादक मिलिंद शेटे,ज्येष्ठ स्वयंसेवक सतीश आठवले,बापूराव कुलकर्णी,व्यवस्थापिका सुनिता पेंढारकर,सहसंपादिका मेघना घांग्रेकर यांची मुख्य उपस्थिती होती. यावेळी उल्हास सावळेकर,प्रकाश देशपांडे,कुलदीप धुमाळे,विवेक बाकरे,अरुण तुळजापूरकर,सुरेश गोरे उपस्थित होते.

महाराष्ट्र व गोव्यातील सर्व खेड्यापड्यापर्यंत जाणारे हे एकमेव पाक्षिक असून दरवर्षी २० नियमित अंक व दोन विशेषांक प्रसिद्ध करणाऱ्या सांस्कृतिक वार्तापत्राचे २६ हजार वर्गणीदार,२२ हजार ग्रामपंचायती,दोन हजार वाचनालये,तीन हजार नियतकालिके,सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी मिळून असे ५३ हजार अंकाचे नियमित वितरण होते.चार लक्ष वाचक सांस्कृतिक वार्तापत्र नियमित वाचतात अशी माहिती व्यवस्थापिका *सूनिता पेंढारकर* यांनी यावेळी दिली.






# बनावट ई-मेल पाठवून बिडकीन येथील एका कंपनीला १८.७८ लाखाला फसवले

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ ऑक्टोबर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण सायवर पोलीसांनी जलद प्रतिसादाने रक्कम गोठविण्यात यश बिडकीन येथील एका नामांकित कंपनीमध्ये दुचाकी, तिनचाकी व चारचाकी वाहनाला लागणारे विविध पार्टची निर्मिती करण्यात येते. या कंपनीला लागणारा कच्चा माल हा त्यांचे इतर ठिकाणचे व्हेन्डर च्या माध्यमांतुन खरेदी केला जातो व मालाचे खरेदीच्या संदर्भातील पत्रव्यवहार हा संवधीत कंपनी ही व्हेन्डरला ई-मेलच्या माध्यमांतुन करण्यात येतो.याच अनुषंगाने कंपनीला त्यांचे एका व्हेन्डरकडुन ई-मेल प्राप्त झाला व त्यामध्ये त्यांनी कंपनीला कच्चा मालाचे उर्वरित रक्कम ही बॅक ऑफ बडोदाचे नविन खात्यात जमा करणे बाबत कळविले, कंपनीने व्हेन्डरच्या नावाने पाठविण्यात आलेल्या ई-मेलला प्रतिसाद देत त्यांची उर्वरित रक्कम ही तात्काळ त्यांनी ई-मेल मध्ये नमुद केलेल्या बॅक खात्यात १८,७८,१११/- रुपये हे ठढऋड/छएऋद्ध द्वारे नेट बैंकिगच्या मार्फतीने पाठविण्यात आले होते. व्हेन्डरला रुपये मिळाले कि नाही याची खात्री करण्यासाठी कंपनीच्या मुख्य लेखाअधिकारी यांनी संपर्क साधला असता व्हेन्डरच्या बँक खात्यात रुपये जमा झाले नसल्याचे त्यांनी कळविले.यावरुन कंपनीला प्राप्त मेलची खात्री केली असता सायवर भामट्याने कंपनीला पाठविलेल्या मेल मध्ये व्हेन्डरचा बनावट व मिळता जुळता ई-मेल आयडी तयार करून व्हेन्डरच्या ई-मेल आयडी तील सारळश्र ऐवजी ारळश्र असे संबोधन देवुन फसवणूक करणारा मेल पाठविण्यात आला आणि त्याच ईमेल मध्ये व्हेन्डरचा नविन बॅक खाते क्रमांक देण्यात आला त्यामुळे कंपनीने दिलेल्या बॅक खात्यात वरिल रक्कम ही जमा केली होती. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मुख्य लेखा अधिकारी यांनी तात्काळ छत्रपती संभाजीनगर ग्रामीण सायवर पोलीसांशी संपर्क साधुन फसवणूक झाल्याची तक्रार दिली. यावरुन पोलीस ठाणे सायवर येथे कलम ४२० भादंवी सह कलम ६६ (ड) आयटी अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.नमुद गुन्हयाचे अनुषंगाने डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक यांचे निर्देशानुसार सायबर ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले व त्यांचे पथकाने तात्काळ कंपनी ने रक्कम पाठविलेल्या बॅक खात्याचा तपशील घेवुन सदर रक्कम ही सायबर भामट्याद्वारे इतर खात्यात वळविण्यात येवू नये या करिता बॅक ऑफ बडोदा यांचे नोडल अधिकारी यांचेशी तात्काळ संपर्क साधुन सदर रक्कम ही गोठविण्यात यश मिळविले आहे. पोलीसांनी अत्यंत तत्परतेने. कारवाई केल्याने सायबर भामटयाला सदरची रक्कम ही काढुन घेता आली नाही व तक्रारदार यांची मोठी रक्कम सुरक्षित करण्यात पोलीसांना यश आले आहे. तक्रारदार यांची रक्कम सुरक्षित असल्याची खात्री सायबर पोलीसांनी दिल्यानंतर त्यांनी सायबर पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.

सायबर भामट्याद्वारे नागरिकांना एस.एम.एस. द्वारे लकी ड्रा, शेअर मार्केट मध्ये दाम दुप्पट करुन देण्याचे आमिष तसेच बनावट लिंक च्या एपीके फाईल आधारे, टेलिग्राम प द्वारे टास्क फ्रॉड जॉब फ्रॉड, फसवे पवर ईन्वेस्ट करून पोर्टफोलिओ वाढविण्याचे आमिष दिले जाते. नागरिक या आमिषाला बळी पडुन कोणतीही खातरजमा न करता लिंक अथवा एस.एम. एस.ला प्रतिसाद देवून त्यांना प्राप्त होणारा ओ.टी.पी. हा सायबर भामटयांना देतात ज्यामुळे त्यांचे बॅक खात्यातील शिल्लक रक्कम ही काढुन घेतली जाते अशा प्रकारे मागील ३ महिण्यात फसवुणक झालेल्या इतर १७ प्रकरणात ग्रामीण सायबर पोलीसांनी सातत्याने पाठपुरावा करून यशस्वीरित्या ४१,१८,८४७/- रुपये गोठविण्यात यश मिळविले असुन त्यापैकी ३८,९९,९७९/- रुपये हे फसवणूक झालेल्या नागरिकांना परत मिळवुन दिले आहेत. ऑनलाईन फसवणुक झाल्यास नागरिकांनी तात्काळ टोल फ्रि क्रमांक १९३० व लूलशीलीळाश.सीं.ळप यावर तात्काळ तक्रार नोंद करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

नमुद कारवाई ही डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस अधीक्षक, सुनिल कृष्णा लांजेवार, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे सायबर ग्रामीण येथील सत्यजीत ताईतवाले, पोलीस निरीक्षक, जगदिश राऊत, सहा. पोलीस निरीक्षक, संतोष मरळ, पो.उप.नि. पोलीस अंमलदार कैलास कामठे, संदीप वरपे, नितीन जाधव, गणेश घोरपडे, मुकेश वाघ, सविता जायभाये, रुपाली ढोले, शितल खंडागळे, यांनी केली आहे

## फर्दापूर परिसरात जोरदार पावसाने विजेच्या कडकडासह झोडपले



फर्दापूर दि ९ - फर्दापूर व परिसरात बुधवारी दुपारच्या सुमारास विजेच्या गडगडासह परतीच्या वादळी पावसाने हजेरी लावल्याने पुन्हा एकदा शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढवल्याने पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. सध्या परिसरात सोयाबीन,मक्का सोंगणी व कापूस वेचणीची लगबग सुरू आहे.असे असताना आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास विजेच्या गडगडासह तब्बल दोन तास मुसळधार पावसाने थैमान घातल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.कापसाच्या तर अक्षरशः वाती झाल्या आहे.वादळी पावसाने मका,तुर व कपाशीचे उभे पीक जमीनदोस्त झाले.मात्र,वादळी वारा व विजेच्या आवाजाने गावकऱ्यांमध्ये धडकी भरली होती.यादरम्यान,नदी,नाल्यांना पूर आल्याने शेतकऱ्यांची घरी येण्याची चांगलीच पंचाईत झाली.या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांच्या हाती तोंडी आलेला घास हिरावला गेला आहे.बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**अहमदनगर प्रादेशिक पर्यटन विकास योजना - सन २०२४-२५**

**ई-निविदा सुचना क्रमांक: १९३/सन २०२४-२५**

प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२४-२५ या कामाची ई-निविदा सुचना क्र. १९३ / सन २०२४-२५ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त, यांचे मान्यतेने)

स्वाक्षरी/-
शहर अभियंता
अहमदनगर महानगरपालिका

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ४३८/२०२४ प्रकरणात पु.ता. २२/११/२०२४

अर्जदार : १) बाळासाहेब धोंडीबा वर्णे, वय ५२ वर्ष, धंदा नौकरी, रा. साई समृध्दी पार्क, फस-२, घर क. ई-५, हर्सुल सावंगी ता. जि. औरंगाबाद. २) चंद्रकला भ्र. धोंडीबा वर्णे, वय ८१ वर्ष, धंदा घरकाम, रा. पिंपळगांव दिवशी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ३) शशिकला भ्र. बाबु बरडे, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, रा. येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ४) संगीता भ्र. मोती पेहरकर, वय ५० वर्ष, धंदा घरकाम, रा. महादेव मंदिर जवळ, येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात अॅड. एम. पी. दारूंटे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १, ३ व ४ हे आपसात सख्खा भाउ व विवाहीत बहिनी असुन अर्जदार क्र. २ हि त्यांची जन्मदाती आई आहे. अर्जदार क १, ३ व ४ यांचे वडील व अर्जदार क २ चे पति नामे धोंडिबा तुकाराम वर्णे हे दि. २३/०७/२०१६ रोजी मौजे पिंपळगांव दिवशी ता. गंगापुर औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हा मुलगा व अर्जदार क २ हि पत्नी व अर्जदार क ३ व ४ हया विवाहीत मुली कायदेशीर वारसदार आहेत. मयत थोंडिबा तुकाराम वर्णे यांना अर्जदार क १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत धोंडिबा तुकाराम वर्षे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. ०९/१०/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र.३६०/२०२४

अर्जदार : १) दादासाहेब लक्ष्मण आरगडे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. धामोरी बु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) पुजा पि. दादासाहेब आरगडे, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण रा. धामोरी बु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) राधा पि. दादासाहेब आरगडे, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा. क. वडील अर्जदार क्र.१ ४) भागवत पि. दादासाहेब आरगडे, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. वडील अर्जदार क्र.१

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ ते ४ यांचे पिता आहे. अर्जदार क्र.१ ची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई नामे सुनिता दादासाहेब आरगडे ह्या मौजे धामोरी बु. ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक ०३/०८/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे. मयत सुनिता दादासाहेब आरगडे यांना अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद करुन या मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज केलेला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक १८/९/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.४०४/२०२४

अर्जदार : १) मुलामबी भ्र करीम शेख वय ७६ वर्षे धंदा निरंक रा अगरवाडगाव ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) हमीद करीम शेख, वय ६६ वर्षे धंदा. शेती, रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) रशिद करीम शेख, वय ६१ वर्षे धंदा. शेती, रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) याकुब करीम शेख, वय ५२ वर्षे धंदा. शेती, रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) अय्युब करीम शेख, वय ५० वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) लतिफ करीम शेख, वय ४७ वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) कादर करीम शेख, वय ४६ वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) अहमद करीम शेख, वय ४४ वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ९) शौकत करीम शेख, वय ४२ वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर १०) फैमुनाबी तैमुर पटेल, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम रा. जळके खुर्द ता. नेवासा जि. अहमदनगर ११) मुमताज भ्र जाफर सय्यद वय ४९ वर्षे धंदा घरकाम रा. खोदेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ९ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र. १० व ११ ह्या त्यांच्या बहिणी आहेत तसेच अर्जदार क्र. १ ही त्यासर्वांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ११ यांचे पिता नामे करीम जमाल शेख हे मौजे अगरवाडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १८/०६/१९९८ रोजी मौजे अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत करीम जमाल शेख यांना अर्जदार क्र.१ ते ११ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत करीम जमाल शेख यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार वारसदार नसल्याचे नमुद अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप- उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक ०९/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

# रिटायरमेंटसाठी निव्वळ मुलांवर अवलंबून राहू नका : गौरव परिजा



पुणे : जसजसे वय वाढत जाते तसतसा रिटायरमेंटदरम्यान तुम्ही स्वतःचे व आपल्या प्रियजनांचे पालनपोषण कसे करणार हा प्रश्न निर्माण होतो. बंधन एएमसीच्या सेल्स अँड मार्केटिंगचे हेड गौरव परिजा म्हणाले, भारतीय परिवारांमध्ये पारिवारिक मूल्य अधिक मजबूत आहे. त्यामुळे माता-पिता लहानपणापासूनच आपल्या मुलांची देखभाल करीत असतात आणि मुलेही त्यांचा सांभाळ करतात. मोठ्यांची देखभाल व सन्मानाचे मूल्य भारतीय परिवाराचा मूळ आधार आहेत. परंतु जेव्हा रिटायरमेंट आणि रिटायरमेंट प्लानिंगची गोष्ट येते, तेव्हा पारंपरिक दृष्टिकोण आजच्या जगात वास्तविक किंवा विश्वसनीय होऊ शकत नाही.

परिजा पुढे म्हणाले, रिटायरमेंट सपोर्टसाठी निव्वळ आपल्या मुलांवर अवलंबून राहणे, खूप जास्त दबाव टाकणारे असू शकते. युवापिढी आपली वित्तीय लढाई स्वतः लढत आहे. त्यांच्याकडे उत्तम संसाधन आहे, मात्र त्यासाठी लागतसुद्धा वाढली आहे. गेल्या काही दिवसांपासून भोजन, पाणी, वीज इत्यादी आवश्यक गरजांमध्ये भरमसाठ वाढ झाल्याने मासिक इन्कमच्या तुलनेत त्यांची क्रयशक्ती कमी झाली आहे. अशा परिस्थितीत ते सेवानिवृत्तीनंतर आईवडिलांची संपूर्ण जबाबदारी घेईल, अशी मुलांकडून अपेक्षा करणे व्यवहार्य नाही. यामुळे त्यांच्यावर अधिक दडपण येऊ शकते.

ते म्हणाले, गेल्या काही वर्षांपासून पारिवारिक माहोल व प्रभाव बदलत आहे. पारंपरिक संयुक्त परिवार संरचनेच्या तुलनेत आता छोटे-छोटे व विभक्त परिवार आम गोष्ट झाली आहे. छोटे परिवार म्हणजे, गैर-कमाऊ सदस्यांच्या पालनपोषणासाठी पैशाची चणचण. बदलत्या परिस्थिती व माहोलनुसार, आता बहुतांश परिवारांमध्ये एक किंवा दोनच मुले असतात. शिवाय नोकरी किंवा संधीच्या त्यांना एकमेकांपासून दूर राहावे लागते. त्यामुळे आईवडिलांना आर्थिक मदत करणे निश्चितच मुलांपुढे फार छोटे आव्हान ठरते.''

परिजा यांच्या मते, वाढते सरासरी वय आणि दैनंदिन खर्च विशेषतः हेल्थकेयर सर्व्हिसवर होणारा अधिक खर्च, यामुळे सर्वांनाच एक मजबूत व सस्टेनेबल रिटायरमेंट योजना बनविणे खूप आवश्यक झाले आहे, जेणेकरून ते इतरांवर बोझ बनणार नाही. वाढते सरासरी वय याचा अर्थ रिटायरमेंटनंतर दीर्घ काळासाठी हेल्थकेयर सर्व्हिस, घर व दैनंदिन जीवनातील खर्च कव्हर करण्यासाठी अधिक वित्तीय संसाधनांची आवश्यकता पडते. एवढा मोठा खर्च करणे मुलांना कठीण जाऊ शकते. मजबूत रिटायरमेंट प्लान नसल्यास वाढत्या वयात हेल्थकेयर सर्व्हिस व अन्य संसाधनांपर्यंत पोहोचणे अवघड होते. त्यामुळेच रिटायरमेंट प्लानिंगचा सर्वांना गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.''

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ४३७/२०२४

अर्जदार : १) अंजली भ्र. अवधुतराव कुलकर्णी, वय ७० वर्षे, धंदा घरकाम रा. काकासाहेब वाड, ब्राम्हण गल्ली गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) विवेक पि. अवधुतराव कुलकर्णी, वय ३१ वर्षे, धंदा नौकरी, रा. काकासाहेब वाडा, ब्राम्हण गल्ली गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ची आई असुन ते वरील नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ चे वडील नामे अवधुत सुंदरराव कुलकर्णी हे गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील कायमचे रहिवाशी होते ते दिनांक ०७/०९/२०२४ रोजी गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत अवधुत सुंदरराव कुलकर्णी यांना अर्जदार क्र.१ व २ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत अवधुत सुंदरराव कुलकर्णी यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक ०९/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हिल एम.ए.क. ४०९/२०२४

अर्जदार : १. विमल भ्र. विलास पदार, वय. ५५ वर्षे, धंदा. मजुरी, रा. निकळक बदनापूर, ता.बदनापूर जि. जालना २. गणेश पि. विलास पदार, वय. २३ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. निकळक बदनापूर, ता.बदनापूर जि. जालना

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत विलास ज्ञानदेव पदार यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ चे पती, अर्जदार क. २ चे वडील यांचे दि. ३०/०७/२०२४ रोजी पखोरा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत विलास ज्ञानदेव पदार यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे विलास ज्ञानदेव पदार यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल.

पुढील तारीख. १३/११/२०२४

आदेशावरून

सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. १५६/२०२४

अर्जदार : १. शकुंतलाबाई सुरेश अजमेरे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, २. राहुल सुरेश अजमेरे, वय-३७ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. सविताबाई उत्तम दसरे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. वाय. आर. जावळे, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत सुरेश किसन अजमेरे हे दि. १०/०५/२०१८ रोजी गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क १ ते ३ हे मयत सुरेश किसन अजमेरे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २०/११/२०२४.

आज दि. ०८/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ४२५/२०२४

अर्जदार : १) हसमतबी भ्र. हसन शेख, वय ८५ वर्षे धंदा निरंक, रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) युनुस हसन शेख, वय ६२ वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) इसाक हसन शेख, वय ७१ वर्षे धंदा. शेती रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) जाहेदाबी भ्र युसुफ शेख, वय ५६ वर्षे धंदा. शेती रा. नारायणपुर बु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) आबेदाबी भ्र. बाबन शेख, वय ६१ वर्षे धंदा. शेती, रा. पेंडापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) हनिफ पि. युसुफ शेख, वय ४४ वर्षे धंदा. शेती, रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) हकिम युसुफ शेख, वय ३९ वर्षे धंदा. शेती, रा. अगरवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) लैलाबी भ्र. रईस सय्यद, वय ५४ वर्षे धंदा. शेती रा. भिवधानोरा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ९) तस्लिम भ्र. अफरोज पठाण, वय ३७ वर्षे धंदा. शेती, रा. जळके बु. ता. नेवासा जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ५ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र. ६ ते ९ हे अर्जदार क्र.२ ते ५ यांचा मयत भाऊ नामे युसुफ हसन शेख यांचे वारसदार आहेत व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई असुन अर्जदार क्र. ६ ते ९ यांची आजी (वडीलांची आई) आहे. अर्जदार क्र.१ चे पति, अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र. ६ ते ९ यांचे आजोबा (वडीलांचे वडील) नामे हसन जमाल शेख हे मौजे अगरवाडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २२/०६/१९८९ रोजी मौजे अगरवाडगाव ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे. मयत हसन जमाल शेख यांना एकुण ५ अपत्ये होती, त्यापैकी युसुफ हसन शेख हा मुलगा दिनांक ०५/०४/२०१८ रोजी मयत झाला असुन युसुफ हसन शेख यांची पत्नी नामे नुरबी युसुफ शेख ह्या दिनांक ०४/०९/२०१७ रोजी मयत झालेल्या आहे, मयत युसुफ हसन व मयत नुरबी युसुफ यांना अर्जदार क्र.६ ते ९ हे अपत्ये कायदेशीर वारसदार आहे. मयत हसन जमाल शेख यांना अर्जदार क्र.१ ते ९ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत हसन जमाल शेख यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप- उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक ९/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

**INVITATION TO THE REMAINING PUBLIC SHAREHOLDERS TO AVAIL THE EXIT OPPORTUNITY UNDER EXIT OFFER**

## TCI DEVELOPERS LIMITED

**Corporate Identification Number (CIN):** L70102TG2008PLC059173
**Registered Office:** Flat No. 306-307, 1-8-271 to 273, 3rd Floor, Ashoka Bhoopal Chambers, S. P. Road, Secunderabad, Telangana - 500003 | **Tel. No.:** +91- 40-27840104 | **Fax. No.:** +91- 40-27840163
**Contact Person:** Ms. Saloni Gupta, Company Secretary & Compliance Officer
**Email id:** secretarial@tcidevelopers.com | **Website:** www.tcidevelopers.com

**Dear Residual Public Shareholder,**

(This public invitation shall be read in continuation of and read in conjunction with and all capitalized terms used in this public invitation shall have the same meaning as ascribed to it in Detailed Public Announcement dated September 02, 2022 published on September 05, 2022 (**"DPA"**), the Letter of Offer dated September 05, 2022 (**"LOF"**), Post Offer PA dated September 21, 2022 (**"Post Offer PA"**), Exit Offer Public Announcement dated November 03, 2022 (**"Exit Offer PA"**), Exit Letter of Offer dated November 11, 2022 (**"ELOF"**) and Corrigendum to the public announcement dated November 17, 2023 and May 31, 2024.

This invitation of the Company is being issued for and on behalf of TDL Real Estate Holdings Limited (**"Promoter Acquirer"**), and other members of promoter and promoter group of TCI Developers Limited to the remaining Public Shareholders (**"Residual Public Shareholders"**) of TCI Developers Limited (the **"Company"**) in adherence with Regulation 27(1)(a) and all other applicable regulations of the Delisting Regulations.

This is to inform to all Residual Public Shareholders that the Equity Shares of the Company have been delisted and trading in the Equity Shares of the Company has been discontinued trading w.e.f. November 11, 2022 (**"BSE and NSE Date of Discontinuance of Trading"**) and the above referred security symbol will be delisted from BSE and NSE with effect from November 18, 2022 (**"BSE and NSE Date of Delisting"**).

In terms of Regulation 27(1)(a) read with Regulation 26 and all other applicable Regulations of the Delisting Regulations, the Promoter Acquirer is inviting the Remaining Public Shareholders to avail the exit opportunity during the one-year exit window after delisting of Equity Shares.

The Residual Public Shareholders who have still not tendered their Equity Shares, can tender their Equity Shares to the Promoter Acquirer at the **Exit Price of Rs. 400/-** (Indian Rupees Four Hundred Only) during the extended period from **June 01, 2024 till May 31, 2025** (both days inclusive) (the **"Exit Window"**) subject to the terms and conditions provided in ELOF.

The Residual Public Shareholders are required to ensure that their Exit Application Form, together with the necessary enclosures, as per ELOF, is received by the Registrar to the **Exit Offer on or before May 31, 2025**.

In case of non-receipt of said Exit Application Form / ELOF or if the same has been misplaced, the Residual Public Shareholders may obtain a copy of the same by writing to the Registrar to the Exit Offer. Copy of the ELOF can also be downloaded from the websites of the BSE at www.bseindia.com, NSE at www.nseindia.com and Company at www.tcidevelopers.com.

**A follow-up email for the quarter ended 2024**, has been sent to all the remaining Residual Public Shareholders in compliance with Regulation 27(1)(b) of the Delisting Regulations.

The Promoter Acquirer will make the payment by way of electronic credit to Residual Public Shareholders who have validly tendered their Equity Shares in Exit Offer following the receipt and verification of duly filled Exit Applications Form(s) (together with necessary enclosures, if any and receipt of the Equity Share(s) in the Special Depository Account / receipt of physical share certificate(s) (along with duly filled in transfer deed(s) as applicable) by the Registrar to the Exit Offer.

Any Residual Public Shareholders seeking any other assistance in connection with their shareholding like issue of duplicate share certificate, rectification of name, transmission of shares, deletion of name of a shareholder in case of joint shareholding, etc. may contact the Registrar to the Exit Offer.

**The Promoter Acquirer accept full responsibility for the information contained in this Public Invitation and confirms that such information is true, fair and adequate in all material aspects.**

| MANAGER TO THE OFFER | REGISTRAR TO THE EXIT OFFER |
|---|---|
| SAFFRON energising ideas<br>**SAFFRON CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED**<br>605, 6th floor, Centre Point, Andheri Kurla Road, J.B. Nagar, Andheri (East) Mumbai - 400 059, Maharashtra, India.<br>**Telephone:** +91 22 4973 0394 \| **Fax:** NA<br>**E-mail:** delistings@saffronadvisor.com<br>**Website**: www.saffronadvisor.com<br>**Investor grievance:** investorgrievance@saffronadvisor.com<br>**SEBI Registration Number:** INM 000011211<br>**Validity of Registration:** Permanent<br>**Contact Person:** Amit Wagle/ Gaurav Khandelwal | KFINTECH<br>**KFIN TECHNOLOGIES LIMITED**<br>Selenium Tower – B, Plot 31 & 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Serilingampally, Hyderabad - 500 032, Telangana, India.<br>**Telephone:** +91 40 6716 2222/ / +91 40 7961 1000<br>**Toll Free No:** 1-800-3094-001 \| **Fax:** + 91 40-23001153<br>**Email:** tci.delistingoffer@kfintech.com<br>**Website:** www.kfintech.com<br>**Investor Grievance Email:** einward.ris@kfintech.com<br>**Contact Person:** Mr. Murali Krishna M<br>**SEBI Registration Number:** INR000000221 |

*For and on behalf of the Board of Directors of TDL Real Estate Holdings Limited (the Promoter Acquirer)*

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| Urmila Agarwal | Karanjit Singh | Ishwar Singh Sigar |

**Place:** Gurugram
**Date:** October 9, 2024

AdBaaz

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# हरयाणातील हॅट्ट्रिक आणि जम्मू-काश्मीर

तब्बल सात-आठ एक्झिट पोल्सचे अंदाज खोटे ठरवून हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाने बहुमत मिळविले आहे. या देदीप्यमान यशाबद्दल भाजपाचे अभिनंदन. हरयाणात काँग्रेसलाच बहुमत मिळेल, असा एक्झिट पोलवाल्यांचा अंदाज होता. त्यांचे अंदाज चुकले. भाजपाची हरयाणातील ही हॅट्ट्रिक आहे. तिसऱ्यांदा या पक्षाची सत्ता तेथे येणार नाही, ती देखील अशा स्थितीत की, अनेक नेते बाहेर पडलेले होते आणि त्यामुळे भाजपात प्रचंड अस्वस्थता होती. तरीही भाजपाचे संघटन, पूर्वीच्या सरकारचे काम, केंद्र सरकारवरील विश्वास आणि कार्यकर्त्यांची मेहनत कामाला आली आणि भाजपाने हरयाणात उत्तम यश मिळविले. अपेक्षा नसली, तरी काँग्रेसच्या वाट्याला आपटीबारच आलेला आहे. हरयाणातील संभाव्य विजयाची नांदी लागताच ती दिल्लीतील काँग्रेसच्या मुख्यालयात ढोलताशे बडवून जल्लोष सुरू झाला होता. तो थांबवावा लागला, यातच सारे आले. हरयाणात काँग्रेसला विजय मिळाला असता तर इकडे महाराष्ट्रात काँग्रेसचे मनोबल उंचावले असते. काँग्रेसने आता आत्मपरीक्षण केले पाहिजे. तिकडे जम्मू-काश्मीरात काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सला विजय मिळताना दिसत असला तरी महाराष्ट्रात त्याचा फार लाभ काँग्रेसला होणार नाही. कारण जम्मू-काश्मीर आणि महाराष्ट्र यांच्या राजकीय समीकरणांत कोणतेही साम्य नाही. तसे ते हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमध्येही नाही. हरयाणात भाजपाने ताकद लावली होती. परिस्थिती फार अनुकूल नव्हती. नाही म्हटले तरी दशकभराची सत्ता आणि त्यावरील राजी-नाराजीचा घटक होताच. तरीही पक्ष जोरात लढला. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हरयाणात फार लोकप्रिय आहेत. त्यांनी हरयाणात सभा घेतल्या. त्यांची भाजपाच्या विजयासाठी मदत झाली. २०१९ मध्ये हरयाणातील दहाही लोकसभा मतदारसंघांत भाजपाचा विजय झाला होता. २०२४ मध्ये मात्र केवळ पाच जागा भाजपाला जिंकता आल्या. राष्ट्रीय पातळीवरही भाजपाचा आलेख २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत खालावला. हरयाणा हे देशाच्या राजधानीला म्हणजे नवी दिल्लीला लागून असलेले राज्य. त्यामुळे त्या राज्यात दिल्लीतील समीकरणांचे पडसाद उमटतात. त्यामुळेच भाजपाच्या पीछेहाटीचा अंदाज वर्तविला जात होता. झाले उलटे. त्यामुळे आता यापुढील निवडणुकांमध्ये एक्झिट पोल्सकडे किती गांभीर्याने पाहायचे, हा प्रश्न आहे. जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशात दशकभरानंतर निवडणुका झाल्या. राज्यघटनेतील ३७० वे कलम रद्द झाल्यावरची आणि राज्याचा विशेष दर्जा काढून टाकला गेल्यावरची ही पहिली निवडणूक. तेथे भाजपाला अपेक्षित यश मिळाले नाही. तशी भाजपाला तेथे फार मोठी अपेक्षा नव्हती. मात्र, जम्मू-काश्मीरमध्ये शांतता निर्माण करण्यासाठी भाजपाच्या केंद्र सरकारने निगुतीने प्रयत्न केल्यानंतरदेखील भाजपाचे घोडे का अडले, यासंदर्भात या पक्षाने आत्मपरीक्षण केले पाहिजे. काश्मिरात काँग्रेस आणि फुटिरतावादी एकत्र आहेत. तेथे भाजपाची एकहाती सत्ता येईपर्यंत तरी राज्यात पूर्ण शांतता आणि स्थैर्य निर्माण होणार नाही. यापूर्वी २०१४ साली नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये जम्मू-काश्मिरात विधानसभेची निवडणूक झाली होती. निकालानंतर जम्मू-काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी व भाजपाने एकत्र येऊन सरकार बनविले. मुफ्ती मोहंमद सईद मुख्यमंत्री झाले. २०१६ च्या जानेवारीत मुफ्ती मोहंमद सईद यांचा मृत्यू झाला. त्यांच्यानंतर त्यांच्या कन्या मेहबुबा मुफ्ती मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्या. २०१८ मध्ये भाजपाने पीडीपीप्रणीत सरकारचा पाठिंबा काढला आणि जम्मू-काश्मीरमध्ये राज्यपाल राजवट लागू करण्यात आली. त्यानंतर राज्याची विधानसभा विसर्जित करण्यात आली व राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. २०१९ मध्ये भारताच्या राज्यघटनेतील ३७० वे कलम काढून टाकण्यात आले. जम्मू-काश्मीर पुनर्रचनेचा कायदा संमत करण्यात आला आणि जम्मू-काश्मीर या राज्याचे जम्मू-काश्मीर आणि लडाख अशा दोन केंद्रशासित प्रदेशांत विभाजन करण्यात आले. दशकभरातील राजकीय व सामाजिक उलथापालथींच्या पृष्ठभूमीवर जम्मू-काश्मिरात निवडणुका झाल्या आहेत हे महत्त्वाचे. हरयाणाच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल भाजपाच्या बाजूने का लागला, याची आणखी काही महत्त्वाची कारणे समजून घेतली पाहिजेत. भाजपाने हरयाणातील सत्तेच्या संदर्भात आवश्यक ती जातीय समीकरणे व्यवस्थित साधली, हा त्यातला एक भाग झाला. हरयाणात जाट समाज हा प्रभावी घटक आहे. भाजपाने जाटेतर समाजांची मोट बांधली. त्यात ब्राह्मण, बनिया, यादव आणि अनुसूचित जातींना सोबत घेतले गेले. त्यामुळे काँग्रेसच्या मुळांनाच हादरे बसले. लोकदलसारख्या प्रादेशिक पक्षांनाही त्यामुळेच पराभवाची चव चाखावी लागली. मनोहरलाल खट्टर यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात जाटांव्यतिरिक्त इतर समूहांमध्ये पक्षाची पोहोच आणि प्रस्थ वाढावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. जाट प्राबल्य असलेल्या हरयाणाच्या राजकारणात हे समीकरण परिणामकारक ठरणार होते. तसे ते ठरले. मनोहरलाल खट्टर यांच्या काळात हरयाणाच्या विकासावर भर देण्यात आला. उत्तम पायाभूत सुविधा निर्माण करणे, आरोग्यसेवा, शिक्षण या क्षेत्रात लक्ष घालणे हे भाजपाच्या सरकारने केले. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही मतदारांना भाजपाने आकृष्ट केले. त्यांची परंपरा त्यानंतर मुख्यमंत्री झालेले नायबसिंह सैनी यांनीही पुढे चालविली. नायबसिंह सैनी सुशिक्षित आहेत. त्यांची नाळ ग्रामीण भागाशी जुळलेली आहे. मुख्यमंत्री झाल्या-झाल्या त्यांनी ग्रामपंचायतींना विकास खर्च करण्यासाठी घालून दिलेली मर्यादा चौपटीने वाढविली. त्याचाही लाभ भाजपाला झाला. याशिवाय, महिला सक्षमीकरण, बेटी बचाओ-बेटी पढाओ इत्यादी मोहिमा सुरू ठेवल्या गेल्या. या तुलनेत काँग्रेसमध्ये अंतर्गत तंटे होतेच आणि त्यामुळे तो पक्ष राज्यात कमकुवत आहे. तरीही अँटी इन्कम्बन्सी वगैरेच्या नावाखाली हरयाणात सत्तांतर घडेल, असे दर्शविले जात होते. काँग्रेस नेते व माजी मुख्यमंत्री भूपिंदरसिंह हुडा यांच्यावर सारी मदार होती. पण, भाजपाची घोडदौड रोखण्यात त्यांना यश येऊ शकले नाही. हरयाणा हे राज्य राष्ट्रीय राजधानी प्रदेशाला (नॅशनल कॅपिटल रिजन- एनसीआर) लागून आहे. त्या राज्यात ग्रामीण भाग असला, तरी तेथे शहरीकरणाचा वेगही अतिशय मोठा आहे. त्यामुळे एकीकडे शेतकरी, ग्रामस्थांना हात देताना शहरी मतदारांना भावणारा विकासाचा दृष्टिकोन स्वीकारून भाजपाने हे यश मिळविले आहे. हरयाणापेक्षा जम्मू-काश्मीरचे राजकारण आणि त्या राजकारणाचा पोत अतिशय वेगळा आहे. जम्मू हा भाग हिंदुबहुल तर काश्मीर खोरे मुस्लिमबहुल. लडाख हा आता वेगळा केंद्रशासित प्रदेश आहे. तो बौद्धबहुल आहे. जम्मू-काश्मीरला फार पूर्वी दिला गेलेला विशेष दर्जा काढून घेतल्याचा परिणाम आपल्या बाजूने वळवण्याच्या तिथल्या प्रादेशिक पक्षांच्या प्रयत्नांना यश आलेले दिसते. शिवाय, केवळ जम्मू भागातच भाजपाची चांगली पैठ आहे. २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत याच भागात भाजपाची कामगिरी चांगली होती. मात्र, जम्मू भागात सरकार बनविता येईल यासाठी आवश्यक तेवढ्या जागा नाहीत. ज्या भागात त्या आहेत, तेथे भाजपाचा प्रभाव कमीच आहे, हे मान्य केले पाहिजे. याशिवाय, राष्ट्रीय मुद्यांचा जो परिणाम उर्वरित देशावर होतो, तसा तो जम्मू-काश्मीर या प्रदेशात होत नाही याचेही कारण तिथल्या भूराजकीय आणि लोकसंख्यीय वैशिष्ट्यांत दडलेले आहे. एकीकडे हरयाणात भाजपाला चांगला कौल मिळालेला असताना जम्मू-काश्मीरने पुन्हा एकदा भाजपाला हुलकावणी दिली आहे. कसेही करून ही कोंडी भाजपाला फोडावी लागेल. त्यातच देशाचे हित आहे. विरोधी पक्ष म्हणून उत्तम काम करण्याची आणि लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाप्रती जागरूकता निर्माण करण्याची संधी भाजपाला आहे. तेवढे संख्याबळही भाजपाकडे आहे. नॅशनल कॉन्फरन्स किंवा पीडीपी किंवा अन्य प्रादेशिक पक्षांकडून अपेक्षा नाही. काँग्रेसकडूनही नाही. ती केवळ भाजपाकडूनच आहे. त्यामुळे हरयाणातील यशाबद्दलच्या अभिनंदनाचा स्वीकार करताना भाजपाला जम्मू-काश्मीर प्रदेशाने पुढे केलेल्या आव्हानांची जाणीव कायम ठेवावी लागेल. ते राजकारणासाठी जसे गरजेचे आहे, तसे ते देशासाठीही आहेच.

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# वायुसेना : देशाचा गौरव

८ ऑक्टोबर १९३२ पासून हळूहळू प्रगती करीत असलेली भारतीय वायुसेना ९३ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. या ९२ वर्षांच्या इतिहासात असे अनेक प्रसंग आले आहेत जेव्हा भारतीय वायुसेनेच्या शूर जवानांनी शत्रूला आपल्या ताकदीची जाणीव करून दिली. प्रत्येक आव्हानाच्या वेळी भारतीय वायुसेनेच्या विमानांनी शत्रूवर कुरघोडी केली आहे. त्याने नेहमी शत्रूंचा नाश केला आहे. प्रत्येक युद्ध जिंकण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सध्या चीन आणि पाकिस्तान सीमेवरील आव्हाने खूपच वाढली आहेत. भारतीय हवाई दलाकडे लढाऊ विमानांच्या ३० स्क्वाड्रन्स आहेत. चीन आणि पाकिस्तानकडून सामरिक आव्हाने पाहता भारताकडे लढाऊ विमानांची सुमारे ४५ स्क्वाड्रन्स असायला हवीत.

सीमेवरील आव्हाने पाहता भारत सरकार सीमावर्ती आघाड्यांवर कोणत्याही शत्रूला संधी देऊ इच्छित नाही. यासाठी भारत पाचव्या पिढीतील लढाऊ विमाने बनवण्याच्या योजनेवर काम करीत आहे. तयार झाल्यावर ही विमाने राफेल विमानांपेक्षा वैशिष्ट्यांमध्ये अधिक शक्तिशाली असतील. भारत सरकार यासाठी मोठा खर्च करण्यास तयार आहे. यासाठी सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानांच्या ५० हून अधिक यंत्रणांना अत्याधुनिक बनवले जाईल. स्वदेशी तंत्रज्ञानाने अद्ययावत झाल्यानंतर ही विमाने अत्यंत धोकादायक बनतील आणि पुढील तीन दशके अधिक चांगली सेवा देऊ शकतील. योजनेंतर्गत पहिल्यांदा ८४ सुखोई विमाने अत्याधुनिक बनवली जाणार आहेत. यामध्ये अत्याधुनिक रडार यंत्रणा बसवण्यात येणार आहे. यामुळे सुखोई-३० एमकेआय फायटर प्लेनची डिटेक्शन रेंज वाढेल. याशिवाय त्यात अणू क्षेपणास्त्रे तैनात केली जातील; ज्यामुळे ३५० किलोमीटर अंतरापर्यंतचे लक्ष्य नष्ट करणे सोपे होईल. ९ सप्टेंबर रोजी भारतीय हवाई दलाने मुख्य लढाऊ विमान सुखोई विमानाच्या इंजिनसाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) सोबत २६ हजार कोटी रुपयांचा करार केला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संरक्षण व्यवहार समितीने २ सप्टेंबर रोजी एरो इंजिन खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. या करारानुसार एचएएल सुखोई-३० एमकेआय विमानांसाठी २४० स्वदेशी तंत्रज्ञान एरो इंजिन (एएल-३१ एफपी) तयार करेल. त्यांच्या बांधकामाची जबाबदारी ओडिशाच्या कोरापूर विभागाकडे देण्यात आली आहे. कोरापूर विभागाने तयार केलेले पहिले इंजिन १ ऑक्टोबर रोजी हवाई दलाकडे सुपूर्द



करण्यात आले आहे. करारानुसार एचएएल दरवर्षी अडीच डझन इंजिनांचा पुरवठा करणार आहे. अशा प्रकारे २४० इंजिनांचा पुरवठा आठ वर्षांत पूर्ण होईल. यामुळे हवाई दलाला सुखोई-३० विमानांच्या ताफ्याची परिचालन क्षमता राखण्यास मदत होईल. इंजिनांसाठीचा करार आयएएफच्या लढाऊ विमानांच्या तुकड्यांमधील कपात आणि एचएएलद्वारे स्वदेशी तेजस विमानांच्या पुरवठ्यात होणारा विलंब यावरील चिंता दूर करेल.

संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ही इंजिने ५४ टक्के स्वदेशी सामग्रीने बनवली जातील. भारतीय हवाई दलासमोरील दुहेरी संरक्षण आव्हाने लक्षात घेता, संरक्षण मंत्रालयाने हवाई दलाच्या विमानांच्या ताफ्याला बळकट करण्यासाठी प्रयत्न तीव्र केले आहेत. आता नव्या पिढीचे सुखोई-३० एमकेई लढाऊ विमान रशियाच्या सह-उत्पादनात बनवले जाणार आहे. यासाठी दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या रशिया दौऱ्यातही हा मुद्दा चर्चेत आला होता. या विमानांच्या निर्मितीसाठी एचएएल आपला कोरापूर कारखाना खास तयार करत आहे. हवाई दलाकडे सध्या २५९ सुखोई विमाने आहेत. यापैकी सर्व कार्यरत स्थितीत नाहीत. २००० ते २०१० दरम्यान बहुतेक सुखोई विमाने हवाई दलात समाविष्ट करण्यात आली होती. ही विमाने दर १५ वर्षांनी अद्ययावत केली जातात. पुढील १० वर्षांनंतर त्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होईल, म्हणूनच हवाई दलाच्या विमानांच्या ताफ्यात नवीन अद्ययावत सुखोई विमाने समाविष्ट करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. रशिया हा भारताचा सर्वात विश्वासू मित्र आहे. आता रशियाने भारताला सुखोई-७५ चेकमेट लढाऊ विमान खरेदीची ऑफर दिली आहे. रशिया हे लढाऊ विमान कमी किमतीत देण्यास तयार आहे. एवढेच नाही तर रशिया सुखोई-७५ चेकमेट लढाऊ विमानाचे तंत्रज्ञानही भारताला देण्यास तयार आहे. ज्या देशांच्या सीमेवर अधिक आव्हाने आहेत त्यांच्यासाठी सुखोई-७५ चेकमेट खूप चांगले असल्याचे रशियन संरक्षण अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. ही अत्याधुनिक विमाने रडारने पकडली जात नाहीत. ही एआय सुसज्ज विमाने आहेत. त्यांचा वेग मॅक १.८ आहे आणि त्यात ३००० किलोमीटर अंतरापर्यंतचे लक्ष्य नष्ट करण्याची क्षमता आहे. हे विमान ७.४ किलो वजनाच्या पेलोडसह ५४ हजारांपेक्षा जास्त उंचीवर उड्डाण करू शकते. ते हवेतून हवेत आणि हवेतून जमिनीवर वापरली जाणारी शस्त्रे स्वतःमध्ये लपवून ठेवू शकते. रशियन अधिकाऱ्यांच्या मते त्यांची किंमत कमी आहे. सुखोई-७५ चेकमेट विमानाची किंमत सुमारे ३ ते ३.५ दशलक्ष डॉलर्स असेल.

भारतीय हवाई दलाच्या विमानांचा ताफा वाढवण्यासाठी स्वदेशी बनावटीची तेजस लढाऊ विमाने खरेदी केली जाणार आहेत. अलिकडेच एचएएलला १२३ विमानांची ऑर्डर देण्यात आली होती. आता आणखी ९७ तेजस खरेदी करण्यात येणार आहेत. त्यानंतर आणखी २०० तेजस विमाने घेण्याची योजना आहे. तेजस मार्क-१ सध्या भारतात तयार होत आहे. येत्या काही दिवसांत, देशात जीई इंजिन एफ-४१४ सह तेजस मार्क-२ लढाऊ विमानांचे उत्पादन सुरू होईल. तेजस मार्क-२ चा प्रोटोटाईप या वर्षी तयार करण्यात येणार असून पुढील वर्षीपासून त्याचे उत्पादन सुरू होईल. २०२६ मध्ये त्याचे पहिले उड्डाण पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. हे विमान मल्टी-रोल सुपरसॉनिक लढाऊ विमान असेल. त्यात एक किंवा दोन क्रू बसू शकतील. या विमानाची लांबी ४७.११ फूट असेल. त्याची उंची अंदाजे १५.११ फूट आणि पंखांचा विस्तार २७.११ फूट असेल. त्यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा वेग. ते ताशी २३८५ किलोमीटर वेगाने उड्डाण करेल. त्याची एकूण श्रेणी २५०० असेल आणि लढाऊ श्रेणी १५०० किलोमीटर असेल. ६५०० किलो वजनाच्या शस्त्रांसह ते उड्डाण करण्यास सक्षम असेल. भारत ५.५ पिढीचे स्टेल्थ लढाऊ विमान विकसित करण्याच्या योजनेवर काम करत आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) ते विकसित करत आहे. हे भारताचे पहिले स्टेल्थ फायटर असेल. त्याचे वजन २७ टन असेल. ते अधिक वजनदार आणि अधिक शस्त्रे वाहून नेण्यास सक्षम असेल. वर नमूद केलेली विमाने मिळाल्यानंतर भारतीय हवाई दलाच्या ताकदीत लक्षणीय वाढ होणार आहे. अशाप्रकारे भारतीय वायुसेना चीन आणि पाकिस्तान या दोन्ही आघाड्यांवर कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यास सक्षम असेल.

## वेध

**गिरीश शेरेकर**

# बदलत्या मानसिकतेचे घातक दुष्परिणाम

उत्तम ग्रंथ व पुस्तकांचे वाचन आणि सज्जनांचा सहवास ही जीवनाची दोन मधुर फळे आहेत, याचे विस्मरण हल्ली अनेक युवकांना झाले आहे. परिणामस्वरूप देश, राज्य, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर आजूबाजूला नजर टाकल्यास अविवेकी, शीघ्रकोपी, गुन्हेगारी, अनैतिक मानसिकता जोपासलेल्या युवकांच्या टोळ्या प्रामुख्याने पाहायला मिळत आहेत. गेल्या तीन-चार वर्षांत हे प्रमाण कमालीचे वाढले आहे. होत असलेल्या या बदलाचे परिणाम त्या युवकांच्या कुटुंबासाठी जेवढे घातक आहे, तेवढेच ते समाजासाठी चिंतेचे झाले आहे. ही मानसिकता एकाएकी बदललेली नाही. जीवनशैलीच्या बदलत्या स्वरूपातून युवकांमध्ये जशी विलासीवृत्ती वाढली तशीच अतिमहत्त्वाकांक्षाही वाढीस लागल्याने चांगले व वाईट यातला फरक समजून वाटचाल करण्याचे भान त्यांना राहिलेले नाही. त्यांच्यातल्या या परिवर्तनाकडे कुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळीचेही दुर्लक्ष होत आहे. वयात येणारी आपली मुले-मुली दररोज जातात कुठे? त्यांचा मित्र परिवार कोणता? ते घरी जे सांगतात तेच ते प्रत्यक्षात करतात का? त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट ही सत्य की असत्य? या सर्व प्रश्नांची उत्तरे बहुतांश पालक आपल्या पाल्यांकडून घेत नसल्याने ते सैरभैर झाले आहेत. त्याला समस्येचे स्वरूप तर आलेच आहे; पण ते आता विक्राळ रूप धारण करीत असल्याचे अलिकडच्या काळात घडलेल्या अनेक घटनांवरून सिद्ध झाले आहे.

अमरावती जिल्ह्यात गेल्या तीन-चार महिन्यांत हत्या, बलात्कारासह अनेक गुन्हेगारी घटना घडल्या. काल तर तीन युवकांच्या हत्या झाल्या आणि हत्या करणारेही युवकच होते. या घटना धक्कादायक आहेत. क्षुल्लक कारणावरून या हत्या झाल्या आहेत. विदर्भाच्या अन्य जिल्ह्यात, राज्यातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये आणि देशातल्या इतर भागांमध्येही अशा घटना घडत आहेत. अमरावती त्याला काही अपवाद नाही. पण, हत्या करणाऱ्यांच्या मानसिकतेचा अभ्यास केला तर त्यांच्यात वाढलेल्या हिंसक वृत्तीचा परिचय येतो. आता ही वृत्ती आली कुठून, हा स्वाभाविकपणे पडणारा प्रश्न असला, तरी त्याचे उत्तर विस्कटत जाणाऱ्या समाज व्यवस्थेच्या जडणघडणीत आहे. हेच सूत्र कमी-अधिक प्रमाणात इतर घटनांसाठी लागू होते. बदलापूर, वरोडा येथील मुलींवरच्या अत्याचाराच्या घटना बोलक्या आहेत. एक विकृत मानसिकता जोपासून मुलींचे लैंगिक शोषण होताना दिसते. दररोज कुठे ना कुठे अशा घटना उजेडात येत आहेत. त्यातल्या काही 'लव्ह जिहाद' या प्रकारात मोडणाऱ्या आहेत तर काही समाज व्यवस्थेला गालबोट लावण्याच्या उद्देशातून केलेल्या आहेत. पण, अनेक मुलींना हा आपल्यासाठी लावलेला सापळा आहे, हे वेळीच लक्षात येत नाही. सापळ्यात पूर्णपणे अडकल्यावर त्यांना जाणीव होते, तेव्हा वेळ निघून गेलेली असते. त्याचे परिणाम मुलीला जेवढे भोगावे लागतात, तेवढेच ते परिवारालाही सहन करावे लागतात.

विशेष म्हणजे मुलीच अशा सापळ्यात अडकतात असे नाही तर मुलेही त्यात अडकली आहेत. अशा घटनांमधील काही मुला-मुलींनी आपले जीवनही संपवून टाकले आहे. समाजात घडणाऱ्या या मन हेलावणाऱ्या घटनांमधून बोध घेण्याची कोणाची तयारी आहे, असे दिसत नाही. कारण, घटनांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतानाच दिसत आहे. उथळपणे वागणे, बोलणे व वेशभूषा करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. बाजूचा करतो म्हणून आपणही केले पाहिजे, या मानसिकतेतून ही स्पर्धा आता वेगळ्या वळणावर आली आहे. भूलथापा देऊन फसवणूक करण्याच्या ज्या घटना समोर येतात, त्या आरोपींच्या यादीतही युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसतो आहे. शॉटकट मार्गाने यश मिळविण्याचा जडलेला हव्यास त्यासाठी कारणीभूत आहे. मग त्यासाठी वाट्टेल त्या मार्गाने जाण्याची मानसिकता युवकांमध्ये दिवसेंदिवस प्रबळ होत आहे. त्याचे दुष्परिणाम आपल्याला पदोपदी पाहायला मिळत आहेत. विवाहबद्ध झालेले तरुण-तरुणीसुद्धा अविवेकी निर्णय घेताना दिसतात. आभासी जगतातून ही मनोवृत्ती फोफावली असून त्याला कुटुंबातले सदस्य नकळत खतपाणी घालतात. पालकांनी आत्मचिंतन करून आपल्या पाल्यांच्या मानसिकतेचा वेळोवेळी अभ्यास करण्याची गरज आहे. शिथिल झालेली पकड घट्ट करून पाल्यांच्या प्रत्येक घडामोडीकडे लक्ष ठेवत वेळातला वेळ काढून त्यांच्याशी संवाद साधायला हवा. तेव्हाच मानसिकतेतला बदल आणि त्याचे दुष्परिणाम थांबतील.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# दसरा : आपट्याची पाने हृदयाचा गर्भितार्थ!

शारदीय नवरात्रौत्सव मोठ्या भक्तिभावाने देशभर साजरा होतो. आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना करून हा उत्सव प्रारंभ होतो. ललिता पंचमी, अष्टमी, महानवमी या दिवसांचे विशेष महत्त्वही आहेच. मात्र, दशमीचा दिवस विजयादशमी म्हणून संपूर्ण भारतात उत्साहात साजरा होतो. या दिवसाला 'दसरा' असेही नामाभिदान आहे. या दिवशी सीमोल्लंघन, सीमांते शमीपूजन, रावणदहन, सोनं लुटण्याची आणि एकमेकांना सोनं म्हणून आपट्याची पाने देण्याची प्रथा आणि परंपरा आहे.

केव्हा सुरू झाली ही सोनं लुटण्याची आणि वाटण्याची प्रथा? : त्रेता युगात वरतंतू नावाचे ऋषी होते. त्यांचा मोठा आश्रम तमसा नदीच्या तीरावर होता. या आश्रमात विद्यार्जनासाठी देशोदेशीचे विद्यार्थी येत असतं. त्या काळात राजाचा मुलगा असो की सर्वसामान्य; सर्वजण समान व्यवस्थेत आश्रमात शिक्षण ग्रहण करीत असत. तिथे कुठलाही भेदभाव नसे. शिक्षण पूर्ण झाले की, साधारणतः बारा वर्षांनंतर सर्वजण आपापल्या घरी प्रस्थान करीत असत. जाण्यापूर्वी सर्वांसाठी निरोप समारंभ होत असे; ज्याला शास्त्रात 'समावर्तन समारंभ' म्हणतात. समावर्तन समारंभात गुरू उपदेश झाल्यावर गुरुपूजन आणि यथाशक्ती गुरुदक्षिणा दिली जात असे. राजपुत्र गोदान, भूदान, सुवर्णदान असे विविध दान तर सामान्य शिक्षार्थी त्यांच्या ऐपतीप्रमाणे दान करीत असत.

वरतंतू ऋषींच्या आश्रमात त्यांचा एक शिष्य होता. त्याचे नाव कौत्स होते. वरतंतू ऋषींच्या आश्रमात असाच समावर्तन समारंभ सुरू होता. त्या प्रसंगी अनेक शिष्य विविध प्रकारांची गुरुदक्षिणा देत होते. हे पाहत असतानाच शिष्य कौत्सलाही इच्छा उत्पन्न झाली की, आपणही गुरूंना गुरुदक्षिणा दिली पाहिजे. त्याने आपला मनोदय गुरुवर्य ऋष्यश्रेष्ठ वरतंतू यांच्याजवळ व्यक्त केला. गुरूंना कौत्सची आर्थिक स्थिती माहीत होती त्यामुळे त्यांनी कौत्सला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. वाटल्यास तुझे शिक्षण पूर्ण झाल्यामुळे आता तू काही वर्षे याच आश्रमात शिक्षक म्हणजे आचार्य म्हणून सेवा दे, अशी सूचनाही त्याला केली. कौत्स मात्र गुरुदक्षिणा देण्यासाठी आग्रही होता. गुरुजींनी काही तरी गुरुदक्षिणा मागावी म्हणून तो हट्ट करू लागला. अनेक वेळा समजावून सांगूनही तो ऐकायला तयार होईना. त्यामुळे गुरुजीदेखील चिडले. वरतंतू ऋषींनी रागावून त्याला चौदा सहस्र सोन्याच्या मोहरा गुरुदक्षिणा म्हणून मागितल्या. अर्थातच इतक्या साऱ्या सोन्याच्या मोहरा कौत्सजवळ नव्हत्याच. पण गुरूला दिलेला शब्द पाळलाच पाहिजे. त्यासाठी काहीतरी व्यवस्था करायलाच हवी, हा विचार सुरू असतानाच त्याच्या सहकारी शिष्याने सुचविले की, शरयू तीरावर अयोध्या क्षेत्रीचे राजे आहेत रघुराजे. रघुराजे दानशूर तर आहेतच; पण ते दिलेले वचन पाळणारे 'प्राण जाय पर वचन न जाय' या तत्त्वाचे आहेत. तिथे जर तू गेलास तर तू रिक्त हस्ताने परत येणार नाहीस.

मित्राचा सल्ला ऐकून कौत्स महाशय मजल-दरमजल करीत अयोध्येच्या दिशेने निघाले. काही दिवसातच त्यांना शरयू तीरावरील भव्य अयोध्या नगरी दिसली. त्यांनी शरयूत स्नान केले आणि आन्हिक आटोपून अयोध्या नगरीच्या वेशीजवळ आले. वेशीजवळ त्यांना एक भव्य कुटी दिसली. कुटीभोवती राजसैनिकांचा गराडा दिसला. चौकशी केली असता त्या झोपडीत स्वतः रघुराजे असल्याचे समजले. अजून चौकशी केल्यावर समजले की, रघुराजांनी अतिप्रचंड विष्णुयाग केला. या यज्ञात सर्वस्व दान करण्याची पद्धत असे. त्या आचारानुसार रघुराजांनी आपली सर्व संपत्ती दान करून ते झोपडीत मुनीवेषात राहत आहेत. त्यांचे खानपान ही मृत्तिकापात्रात म्हणजे मातीच्या भांड्यात आहे. शय्यादेखील गवताच्या चटईवर आहे. हे सर्व पाहिल्यावर कौत्स नाराज झाले. म्हणाले, 'इथे हेच झोपडीत राहतात तर माझी व्यवस्था ते कसे करतील?' म्हणून खिन्न होऊन परतीला निघणार तोच रघुराजांची दृष्टी त्यांच्यावर पडली. कुणीतरी द्विज आलेला दिसतो म्हणून सैनिकाकरवी कौत्सांना त्यांनी पाचारण केले. कौत्स महाभागांचे आदरातिथ्य करून येण्याचे प्रयोजन विचारले. कौत्स म्हणाले, "हे राजन, मला आपल्याकडे काम होते; पण तुझीच अवस्था दिगंबर आहे तर तुला अडचणीत मला टाकायचे नाही. मी माझे काम अन्य ठिकाणी जाऊन करेन." तेव्हा रघुराजे म्हणाले, "आम्ही सूर्यवंशी राजे आहोत. आम्ही संपत्तीचे दान केले, पण आमचे बाण, खड्ग शाबूत आहेत. हे कौत्स महोदय, तुम्ही फक्त तुमचा मनोदय सांगा." कौत्सांनी संपूर्ण घटना सांगितली आणि म्हणाले, "हे राजा, मला तुझ्याकडून चौदा हजार सुवर्णमुद्रा अपेक्षित आहेत. शक्य असल्यास द्या. माझा आग्रह नाही." रघुराजे ताडकन जागेवरून उठले. त्यांनी धनुष्याला प्रत्यंचा चढविली. भाता पाठीला लावला आणि ते कुटीच्या बाहेर मैदानात आले. त्यांनी शरसंधान केले ते थेट देवेंद्राच्या दिशेने. इंद्रांना आव्हान दिले की, "हे देवेंद्र! मला सोन्याच्या मोहरा पाहिजेत. त्या ताबडतोब द्या अन्यथा युद्धाला तयार राहा." रघुराजांचा पराक्रम इंद्रराजाला माहीत होता. त्यांनी आपले कोषाध्यक्ष भगवान कुबेरांना सूचित केले की, आपले सुवर्ण भंडार रिक्त करा आणि अयोध्यापती रघुराजांकडे सुवर्णराशी स्वर्गातूनच ओता." देवेंद्राच्या आज्ञेप्रमाणे कुबेरांनी सोन्याच्या राशीच्या राशी ओतण्यास प्रारंभ केला आणि संपूर्ण खजिना रिकामा केला. अयोध्येत सुवर्णाचा पहाड तयार झाला. रघुराजांनी कौत्स यांना सांगितले, "हा खजिना तुमचा आहे. तो घेऊन जा आणि वरतंतू ऋषींना देऊन गुरुदक्षिणेचा संकल्प पूर्ण करा." तेव्हा कौत्स म्हणाले, "हे राजन ! माझा संकल्प चौदा सहस्त्र सुवर्ण मोहरांचा आहे. मी तेवढीच याचना आपल्याकडे केली होती. त्यामुळे मी तितक्याच मोहरा नेणार आहे. उर्वरित मोहरा तुझ्याच अधिकाराच्या आहेत." रघुराजे म्हणाले, "अहो महोदय! या मोहरा मी आपल्यासाठीच घेतल्या आहेत त्यामुळे त्यावर अधिकार तुमचाच." पण कौत्स ऐकेनात. शेवटी असे ठरले की, उरलेले सोने नागरिकांमध्ये वाटून द्यायचे. म्हणून दवंडी दिली की, 'अयोध्येच्या वेशीजवळ सोन्याची लूट ठेवली आहे. सर्वांनी सोने लुटण्यासाठी वेशीजवळ यावे.'

लोकं सीमेवर आलीत. त्यांनी सोने लुटले आणि घरी नेले. दवंडी प्रत्येकाने ऐकली नसल्यामुळे काही जणांना सोने मिळाले नाही. ते त्रेतायुग असल्यामुळे स्वार्थ नव्हताच. ज्यांना सोनं मिळालं नाही त्यांच्या घरी जाऊन ज्यांना सोनं मिळालं ती मंडळी सोनं देऊ लागली. एकमेकांना सोनं देऊन आलिंगन भेट घेऊ लागले. कुबेराने राशी ओतल्या तो दिवस दसऱ्याचा होता. सोन्याच्या राशी आकाशातून ज्या झाडावर पडल्या ते झाड आपट्याचं होतं. त्यामुळे दसऱ्याला आपट्याची पाने सोने म्हणून वाटतात. सोने वेशीजवळ पडल्यामुळे लोकांना सोने लुटण्यासाठी सीमेवर जावं लागले. तीच प्रथा आजही दसऱ्याला सोने लुटण्यासाठी गावाच्या सीमेवर सीमोल्लंघनासाठी जातात. त्यावेळी सोने एकमेकांना वाटले होते. खरं सांगू! आपली संस्कृती जीवीच्या जिव्हाळ्यावर आधारित आहे. आपट्याची पाने हृदयाच्या आकाराची आहेत. सोने म्हणून आपट्याची पाने देतो म्हणजे आपलं हृदय, हृदयाचा गर्भितार्थ देतो. भावभावनांचे आदानप्रदान म्हणजे दसरा. अतूट नात्यांचे स्मरण म्हणजे दसरा.

९८२२२६२७३५

### चिकनगुनिया : एक भयंकर दुखणं

गेल्या चार महिन्यांपासून संपूर्ण विदर्भात विशेषतः नागपुरात चिकनगुनियाचा भयंकर प्रकोप जाणवतो आहे. आजाराचे खरे नाव 'चिकुनगुन्या' असे आहे. चिकुनगुन्या या आफ्रिकेतील किमाकोंडे भाषेतील शब्दाचा अर्थ 'वाकून चालणे' असा आहे. तीव्र सांधेदुखी आणि स्नायुदुखीमुळे रुग्ण वाकून उभा राहतो आणि चालतो. पण आपल्या मराठीत आपण त्याचा चिकनगुनिया असा उच्चार करतो. मांसाहार करणाऱ्या म्हणजे चिकन खाणाऱ्या व्यक्तींनाच हा आजार होतो, असा पण गैरसमज आहे. चिकनगुनियाचे निदान रक्त तपासणी करून केले जाते. चिकनगुनिया विषाणूच्या प्रादुर्भावाने तयार झालेली प्रतिपिंडे निदान करण्यास मदत करतात. हे प्रतिपिंड रोग सुरू झाल्यापासून एका आठवड्यानंतर रुग्णाच्या रक्तात आढळतात आणि त्याद्वारा रोगाचं निदान होऊ शकते. दोन-तीन आठवड्यांत ते रक्तात येतात. रोग सुरू झाल्यापासून एक आठवड्याच्या आधी चाचणी नकारार्थी येण्याची शक्यता असते. आजार सुरू झाल्यानंतर अगदी दुसऱ्या दिवशीसुद्धा आरटीपीसीआर ही चाचणी होकारार्थी अहवाल देऊ शकते. पण ती चाचणी महाग (जवळपास तीन हजार रुपये) असल्याने कमी वापरली जाते. हा आजार झालेल्यांना अतिशय तीव्र सांधे आणि स्नायुदुखीचा जीवघेणा अनुभव येत असतो.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## वाचक पत्रे

### वाहतूक कोलमडली

नागपूर शहरातील वाहतुकीची अवस्था शोचनीय झाली आहे. अनेक ठिकाणी डागडुजी, विस्तारीकरण, नाल्या खोदणे, गट्टू लावणे व रस्ते सिमेंटचे करणे इत्यादी कामे युद्धपातळीवर सुरू झाली आहेत. यामुळे वाहतूक विस्कळीत होत असून नागरिकांमध्ये मनस्ताप वाढतो आहे. कुठल्याही चौकात सिग्नलवर न थांबण्याचा नागपूरकरांनी पण केलेला दिसतोय्. चौकात पोलिस जरी उभा असेल तरी त्याच्या समोर सिग्नल तोडण्यात फुशारकी मारणारे महाभाग काही कमी नाहीत. या चढाओढीत मुली, मुले व महिला पण आघाडीवर आहेत. निदान चारचाकी वाहनांकडून तरी अपेक्षा असते, ते पण डावी-उजवीकडे पाहून गाडी पुढे नेतात. अनेक सिग्नलवर वेळ दर्शविणारी घड्याळं नाहीत. रिंग रोडवर वाहतूक प्रचंड प्रमाणात असते. त्याच्या आजूबाजूच्या वस्तीमधून तुरळक वाहतूक असते. पण लाल-हिरव्या दिव्याची वेळ ही सारखीच दिलेली आहे. त्यामुळे समोरील वाहन चालक आजूबाजूला पाहून वाहतुकीचा अंदाज घेतो आणि न थांबता आपले वाहन पुढे नेतो. अशा सिग्नलचे निरीक्षण करून थांबण्याच्या वेळा पुन्हा निर्धारित केल्या पाहिजेत. आपल्या पाल्यांना शाळेत पोहोचविण्यासाठी दुचाकीचा वापर करणारे पालक मुलांच्या समोर सिग्नलवर न थांबता सर्रास निघून जातात. शाळकरी मुलांवर काय संस्कार होत असतील? मोठेपणी ही मुले काय नियम पाळणार आहेत? तसेच अनेक चौकात कॅमेरे बंद असून काही कॅमेऱ्यांनी माना टाकल्या असून त्यांची दुरुस्ती किंवा नवीन बसवावे लागतील. या कॅमेरातून सिग्नल तोडणाऱ्यांची नोंद होऊन दंडाचे चालान किंवा मोबाईलवर संदेश आला की, काही प्रमाणात वाहतूक सुरळीतपणे होऊ शकते. वस्तुतः नागरिकांनी स्वतःहून वाहतूक नियमांचे पालन करायला पाहिजे. असे झाल्यास सर्वांनाच सुरक्षा प्रदान होईल.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### लाडक्या बहिणींची जबाबदारी वाढली

महाराष्ट्र सरकारने अनेक लोकोपयोगी योजना लागू केल्या. जनतेच्या त्या इतक्या फायद्याच्या ठरल्या की, प्रत्येक लाभधारक मनोमन खूश होताना दिसत आहेत. त्यातल्या त्यात सर्वात हिट कोणती योजना होती तर ती होती लाडक्या बहिणींची. मुख्यमंत्र्यांनी या योजनेंतर्गत रुपये दीड हजार प्रत्येक बहिणीच्या खात्यात जमा होणार, अशी घोषणा केली आणि नुसती घोषणाच केली नाही तर ती प्रभावशाली राबविली आणि बहिणींच्या खात्यात खटाखट पैसे दर महिन्यात जमा होत गेले. अनेक बहिणी तक्रार करायच्या की, आमचे पैसे अजून आलेच नाही हो, शेजारच्यांचे आले आणि मग आधार लिंक वगैरे सर्व बाबी तपासल्या जायच्या आणि अचानक एक दिवस, पैसे जमा झाले भाऊ, असा मेसेज यायचा आणि बहिणींच्या चेहऱ्यावरचा तो आनंद खूप मोठा दिसायचा. गरीब घरच्या महिलांसाठी तर ही पर्वणीच ठरली. आता लवकरच महाराष्ट्रात निवडणूक होणार आहे. जर हेच सरकार पुन्हा सत्तेवर आले तर ही योजना पाच वर्षे चालेल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहेच; त्यामुळे शिंदे सरकारने आपली जबाबदारी पूर्ण पार पाडली आहे. आता जबाबदारी लाडक्या बहिणींची वाढली आहे. असेच खटाखट हवे असेल तर मतपेटीतूनही खटाखट भाजपाला मते पडली पाहिजे. कारण जे म्हणतात ते करतात म्हणून भाजपाच सत्तेवर हवा. तेव्हा बहिणींनो मनावर घ्या हे सगळं...

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विकासाचा आश्वेमेध सुरच ठेवायाचा असेल तर गेवराईत लक्ष्मण पवारा शिवाय पर्याय नाही

## कहो दिलसे आण्णा फिरसे जनतेत होऊ लागली चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.९ ऑक्टोबर**

विधानसभा मतदारसंघात गावोगावी विकास जाव म्हणून आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात प्रमाणिक प्रयत्न केले आहे यांची साक्षीदार मतदारसंघातील मतदार आहे आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी आमदार झाल्यानंतर लगेचच गेवराई मतदारसंघातील राशन वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे करुन तत्कालीन अन्न पुरवठा नागरी मंत्री स्वर्गीय गिरीश बापट साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून राशनचा काळाबाजार बंद करण्यासाठी राशन व्यवस्था ऑनलाईन केली पाहिजे अशी मागणी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी त्यांच्या त्यांच्याकडे करून ऑनलाईन पद्धत सुरू झाल्यानंतर राशींच्या काळा बाजारावर प्रतिबंध लागेल असे ते म्हणाले होते.

आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या मागणीची दखल घेत महाराष्ट्र सरकारने राशन वितरण व्यवस्थेत बायोमेट्रिक प्रणाली लागू लागू करून सर्व रेशन कार्डधारकांना न्याय देण्याचा आमदार लक्ष्मण पवार साहेबांनी प्रयत्न केलेला आहे त्यामुळे आज थम दिल्याशिवाय राशन मिळत नाही त्यामुळे राशींच्या होणाऱ्या काळबाजारावर बऱ्यापैकी परिणाम झालेला आज महाराष्ट्रात दिसत आहे हे आमदार लक्ष्मण पवार साहेबांच्या आमदारकीच्या काळातील पहिले यश आहे

त्यानंतर गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये सन २०१२, २०१३,२०१४, मध्ये गेवराई मतदार संघाचा दौरा करत असताना आलेले कटू अनुभवाचा अभ्यास करून गेवराईच्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेले मतदारसंघाकडे दुर्लक्ष याची जाणीव ठेवून आमदार म्हणून निवडून आल्या नंतर त्यांनी पूर्ण मतदारसंघाचा बायोडाटा तयार करून टप्प्याटप्प्यानं निधी उपलब्ध करत मतदारसंघातील रस्ते जोडणी ला सुरुवात केली नऊ वर्षांमध्ये मतदारसंघातील प्रत्येक रस्त्याला हायवेची जोडत असताना जास्तीत जास्त शॉर्टकट रस्ता कसा तयार होईल यासाठी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी प्रामाणिकपणे काम केले मंजूर मंजूर करून आणलेला निधी योग्यरीत्या मार्गे लागावा म्हणून प्रत्येक रस्त्यावर चालू असलेल्या कामाची जातीने पाहणी करत दर्जामध्ये कुठलीही तडजोड न करता गेवराई मतदार संघातील दर्जेदार रस्ते निर्माण करून महाराष्ट्रामध्ये स्वतःची रोडकरी अशी ओळख आमदार लक्ष्मण पवार यांनी निर्माण केलेली आहे

काही काही दिवसावर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची तयारी आहे सर्व राजकीय पुढारी आपण निवडून कशी येऊ याची जोडणी करत आहे पण गेवराईचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार निवडणुकीची नव्हे तर मतदारसंघातील रस्ते जोडणी करण्यासाठी काम करत असल्याने जनतेमध्ये आमदार लक्ष्मण आण्णा पवारांचे जनतेत कौतुक करून कहो दिल से अण्णा फिरसे याची चर्चा जनता करत आहे.

# नाट्यगृहास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या-आ.लक्ष्मण पवार

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह नामकरण न.प. केला ठराव मंजूर



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.९ ऑक्टोबर**

शहरातील कोल्हेर रोड येथे वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी आ.लक्ष्मण पवार यांनी दि.७ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे केली होती आ.लक्ष्मण पवार यानी केलेल्या मागणीची दखल घेत गेवराई नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी विक्रम मांडरके यानी घेतलेल्याल्या बैठकीत आ.लक्ष्मण पवार यांच्या आलेल्या पत्रावर कोल्हेररोड वरील उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह असे नामकरण करण्यासाठी ठराव मंजुर करण्यात आला त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह नामकरण झाले आहे त्यामुळे नागरिकांत आनंद व्यक्त होत आहे

यापूर्वी गेवराई शहरातील बाजारात तळावरील तापडीया सिटी सेंटरचे

### आमदार लक्ष्मण पवारांच्या मागणीची दखल

महात्माफुले शाँपीग सेंटर असे नामकरण करण्यात आले तसेच छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे अनेक नामकरण आ.लक्ष्मण पवार यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.

# शिवसैनिकांनो, बीड विधासभेची जागा जिंकायची असेल तर मोठ्या ताकदीने कामाला लागा-डॉ.श्रीकांत शिंदे

## बीडमधील अनिल जगताप झंझावात विधान भवनात पोहचला पाहिजे-अर्जुनराव खोतकर; डॉ श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत विधानसभा जनसंवाद दौरा मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ ऑक्टोबर**

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब तळागाळातील जनतेसाठी अठरा-अठरा तास काम करत लोककल्याणकारी योजना अमलात आणत आहेत त्यामुळे या योजनाचा लाभ घराघरात पोहचवा. मुख्यमंत्री शिंदे साहेबांची कुशल कार्यप्रणाली सामान्य जनतेपुढे मांडा. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आपला विजय पक्का आहेच. मात्र आपल्याला मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी आणि महाराष्ट्रावर आपल्या शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी मोठ्या ताकदीने काम करावे लागेल. बीड विधानसभेची जागा जिंकायची असेल तर शिवसैनीकांनो कामाला लागा, वेळ कमी राहिलेला आहे. बीड मतदार संघात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप हे जोमाने काम करत असून आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत असे आवाहन करत अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी बीड मतदार संघात विकास कामाबाबत आमच्यासमोर यादी दिलेली आहे. येत्या काही दिवसात ती कामे आम्ही पूर्ण करू असे डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांनी शिवसैनिकांना अश्वस्त केले. बीड विधानसभेच्या तोंडावर काल दि. ८ ऑक्टोबर रोजी दु ३.०० वाजताच्या दरम्यान बीड नगरीत शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानसभा जनसंवाद दौरा मेळावा संपन्न झाला. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांनी शिवसैनिकांशी मुक्त संवाद साधल्याने बीड शिवसैनकांच्या अंगी नवीन ऊर्जा संचारल्याचे दिसून येत आले. याप्रसंगी शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, बाप्पूसाहेब मोरे यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी- लोकप्रतिनिधी, महिला-भगिनी, शिवसैनिक आणि पत्रकार बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

बीड मतदारसंघांमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचा झंजावात सुरू झालेला दिसून येत आहे हा झंझावात विधानसभेच्या सभागृहात पोहोचविण्याकरिता आपल्या सर्वांना मोठ्या ताकदीने कामाला लागले पाहिजे. याबरोबरच सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी देखील सर्व शिवसैनिकांना शिवधनुष्य उचलण्याची गरज असून महाराष्ट्रावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकविण्यात आपले योगदान देणे अत्यावश्यक आहे. असे शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या भाषणात शिवसैनिकांना आवाहन केले.

**मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे- अनिलदादा जगताप**

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे.

बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्यची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे आशीर्वाद आणि डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांचे सहकार्य आपल्यासोबत आहेत त्यामुळे आपला विजय पक्का आहेच आता तुम्ही कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा जन संवाद दौरा मेळाव्यात केले.



# मोफत आरोग्य तपासणी तसेच सर्व रोगनिदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.९ ऑक्टोबर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख श्री भोजराज पालीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भवानीनगर दुर्गोत्सव मंडळाच्या वतीने आज मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी भव्य मोफत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण तसेच सर्व रोग निदान शिबिर भवानीनगर परळी वैजनाथ या ठिकाणी १० वाजता संपन्न झाले. या कार्यक्रमाची प्रारंभी श्री भोजराज पालीवाल यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. तज्ञ डॉक्टर सौ रुपाली विकास आलदे यांच्या मार्गदर्शनाने सर्व प्रकारचे रक्तदाब, सांध्याचे विकार, त्वचा विकार, वात विकार, पोटांचे विकार, महिलांचे विकार, मुतखडा, मुळव्याध, कावीळ ,लहान मुलांची विकार, मनोविकार इत्यादी विकारांची रोगनिदान आणि तपासणी केली गेली. या शिबिरात दोनशे महिलांनी आरोग्य तपासणी केली.

या प्रसंगी डॉ.सौ रूपाली आलदे म्हणाल्या की, शिवसेनेचे तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भवानीनगर दुर्गोत्सव मंडळ दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की विविध शिबिराच्या माध्यमातून जे व्याधीग्रस्त आहेत, ज्यांना जे काही आजार आहेत ते आजार त्यांचे दूर व्हावे आणि आजारी कोणीही पडू नये असे सांगून त्या म्हणाल्या की जंक फूड कडे जी नवीन पिढी , वळलेली आहे त्याने अनेक प्रकारचे आजार उत्पन्न होऊ लागलेले आहेत. त्यामुळे अनावश्यक पैसा खर्च होऊ लागला याचा परिणाम सर्वात जास्त लहान मुलांवर होऊ लागला. त्यांना सतत चिडचिडपणा ,अभ्यासात लक्ष न लागणे ,जे आजार मोठ्या माणसांना होत असतात तेच आजार कमी वयात लहान मुलांना होऊ लागले आहेत. या अनुषंगाने आयुर्वेद हा घरोघरी पोहोचला पाहिजे आणि कमीत कमी पैसा आरोग्यावर खर्च झाला पाहिजे. यासाठी अशा शिबिरांची मोहीम पूर्ण देशभर गतिमान आहे. या शिबिराच्या माध्यमातून त्यांना आध्यात्मिक तिकडे नेण्याचा प्रयत्न केला जातो. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष हरीश रामदेव पालीवाल तर उपाध्यक्ष गणेश सुनील शिरसाठ यांची निवड करण्यात आली सचिव रवी केशरमल गोड कोषाध्यक्ष राहुल अशोक उपाडे कार्याध्यक्ष विजय अशोक जाधव यांची निवड संस्थापक सदस्य गजराज पालीवाल महेश केंद्रे डॉक्टर तुषार पिंपळे संदीप चौधरी यांनी केली या बैठकीस भवानीनगर दुर्गा उत्सव मंडळात बालासाहेब गवळी महादेव इंगळे राम आंधळे विशाल सुगरे ईश्वर मुंडे कैलास जोगदंड गोविंद मस्के आदिनाथ जाधव हनुमान सिताबराव यशराज पालीवाल आदींनी प्रयत्न केले.

# माजीमंत्री शिवाजीराव पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा

## अभिष्टचिंतन सोहळा आयोजन समितीचे आवाहन




**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.९ ऑक्टोबर**

गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८७ व्या वाढदिवसानिमित्त गुरुवार, दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. शिवनगरी, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते साधु, संत-महंत यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीने केले आहे. शिवछत्रप्रेमींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

# बियाणे समिती : केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या उपससमितीच्या सदस्यपदी गोविंद देशमुख, विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची निवड

## कृषिमंत्री धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे यांनी केले अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.९ ऑक्टोबर**



केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालय अंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी आणि फलोत्पादन बियाणे उपसमितीच्या सदस्यपदी परळी वैजनाथ येथील गोविंदराव देशमुख, ॲड.विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने याबाबतचे परिपत्रक नुकतेच जाहीर केले आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने या पदाधिकाऱ्यांची शिफारस केली होती.

# १३ कोटींचा अपहार, सत्यभामा बांगर अटकेत

## रामकृष्ण बांगरसह ४१ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ ऑक्टोबर**

जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांनी केलेल्या लेखापरिक्षणात रामकृष्ण बांगर हे महात्मा फुले अर्बन बँक लिमीटेडचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांची पत्नी सत्यभामा बांगर या पाटोदा तालुका दुध संघाच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन आहेत. त्यांनी चेअरमन, संचालक, पदाधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन १३ कोटी २१ लाख ६० हजार २५ रुपयांचा अपहार व गैरव्यवहार केलेला आहे. तसेच १४ संस्थेचे कोणतेही कागदपत्र न घेता, मागणी अर्ज न घेता, कोणतेही तारण न घेता बनावट कागदपत्र तयार करुन ते खरे असल्याचे भासवत त्यांच्या नावे कर्ज दाखवून ही रक्कम स्वतः उचलून गैरव्यवहार केलेला आहे. या प्रकरणी ४१ जणांवर पाटोदा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल असून यामध्ये सत्यभामा बांगर यांना अटक केली असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली. ४१ जणांवर कलम ४२०, ४०६, ४०९, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आदित्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी भूषण निकम यांना कृषी उद्योजकता विस्तार क्षेत्रातील कार्याबद्दल वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ ऑक्टोबर**

नाशिक जिल्ह्यातील युवा उद्योजक व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कृषी विस्ताराचे विविध उपक्रम राबवून शेतकऱ्यांना कृषी उद्योजक घडवणारे कळवणचे कृषिभूषण ग्रोवर्स प्रोड्यूसर कंपनीचे अध्यक्ष, ग्रोकेअर कृषी मंच संस्थेचे संस्थापक आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी भूषण निकम यांना महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने २०२२ या वर्षाचा वसंतराव नाईक शेती मित्र हा पुरस्कार कृषी उद्योजकता व विस्तार या क्षेत्रातून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे, कृषी क्षेत्रातील अधिकारी, मान्यवर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व एक लाख वीस हजार रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप होते. भूषण निकम यांनी आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर

नोकरीच्या मागे न लागता २००८ मध्ये ग्रोकेअर कृषी मंच या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभर शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञान देण्याचे काम सुरू केले. आजवर दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

# खा.रजनीताई पाटील केला माजलगावच्या घटनेचा तीव्र निषेध

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ ऑक्टोबर**

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात एका साडे पाच वर्षाच्या चिमुरडीवर झालेला लैंगीक अत्याचार घटनेचा राष्ट्रीय काँग्रेसच्या खा.रजनीताई पाटील यांनी जाहीर निषेध करुन या घटनेत सहभागी असणाऱ्या नराधमाला कठोरात कठोर शासन करावे. महाराष्ट्रात महायुती सरकारच्या काळात महिला व मुली असुरक्षित असल्याचे खा.पाटील यांनी यावेळी सांगीतले.

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार एकीकडे लाडकी बहीण योजना देऊन महिलांना खुश करण्याचा प्रयत्न करत असले तरी प्रत्यक्षात राज्यातील बहिणीवर किती अत्याचार होत आहेत मागच्या काही महिन्यांपासून अत्याचाराच्या किती घटना घडत आहेत हे देखील सरकारमध्ये असलेल्या सत्ताधाऱ्यांनी चिंतन करावे. महाराष्ट्रात दररोज अशा अनेक घटना समोर येत असताना राज्य सरकार मात्र याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. महायुतीच्या सरकारने महिलांच्या सुरक्षेकडे लक्ष देणे अपेक्षित आहे मात्र केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे सरकार फक्त आणि फक्त राजकारण करत आहे मात्र अतिशय लहान, अल्पवयीन मुली, स्त्रिया सद्या असुरक्षित आहेत. २५ते २८ सप्टेंबर च्या दरम्यान ही अमानुष घटना घडली असून याचा एक महिला म्हणून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने मी घटनेचा मी जाहीर निषेध करते व या घटनेत सहभागी असणाऱ्या आरोपीला कडक शासन व्हावे.अशा वाईट घटना करणा-या नराधमांना कठोर शासन व्हावे अशी मी महाराष्ट्र राज्य सरकारकडून अपेक्षा केली आहे.



धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे मराठा संघर्षयोद्धा मा. मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत पारंपारिक भव्य दसरा मेळावा संपन्न होत आहे. काल नियोजन निमित्ताने भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी नारायण गड येथे महंत शिवाजी महाराज यांची भेट घेतली. यावेळी विश्वस्त दिलीप अण्णा गोरे ॲड. महादेव तुपे, बी.बी जाधव, राजेंद्र मस्के, बळिराम गवते, बालाजी पवार, बापूराव जाधव, मेंबर सचिन मस्के, अण्णासाहेब मस्के, हनुमंत मस्के, युवराज मस्के, रसाळ सर, शरद बडगे, महेश सावंत, वसंत गुंदेकर, राकेश बिराजदार, मारोती तिपाले, बद्रिनाथ जटाळ, बहिर सर, सचिन आगाम, अविनाश नवले, धनराज गवळी आदी उपस्थित होते.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते ई-लोकार्पण

## हिंगोली जिल्हा आरोग्य क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्नशील- अभिनव गोयल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ आक्टोबर**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई अधिनस्त हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाचे ई-लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज करण्यात आले.

या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण व आयुष (स्वतंत्र पदभार) राज्यमंत्री प्रतापराव जाधव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण व आयुषचे अध्यक्ष राजीव निवतकर, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे हे ऑनलाईन उपस्थित होते. तर हिंगोली येथून जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, माजी आमदार गजानन घुगे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी हिंगोली येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु झाल्यामुळे जिल्ह्यातील अनेक गोष्टींचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे विकास होणार आहे. तसेच जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा निर्माण होणार आहे. या वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी संघर्ष केलेल्या समितीचे, आजी माजी लोकप्रतिनिधी, पत्रकार तसेच हिंगोलींकराचे अभिनंदन केले. या वैद्यकीय महाविद्यालयामुळे उपचारासाठी एकही रुग्ण बाहेर गावी पाठविण्याची गरज भासू नये यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच हिंगोली जिल्हा आरोग्य क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्न राहील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

हिंगोली येथील शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाच्या लोकार्पणाचे ई-प्रक्षेपण जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व धन्वंतरी मूर्तीला पुष्पहार अर्पण करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल यांनी हिंगोली येथे शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाची सुरुवात यावर्षीपासून होत आहे. यावर्षी १०० विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून प्रवेश मिळणार आहे. याबाबतची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. या महाविद्यालयासाठी वळू माता प्रक्षेत्राची १५.२९ आर जमीन उपलब्ध झाली आहे. या जागेमध्ये १०० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व संलग्रित ४३० खाटांचे रुग्णालय, वसतीगृह व निवासस्थान इत्यांदीचे बांधकाम करण्यात येणार आहे. या इमारत बांधकामासाठी मेकॉन लि. दिल्ली या कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. हे बांधकाम पूर्ण होण्यासाठी अंदाजे ५ वर्षे लागणार असल्यामुळे नवनिर्मित वैद्यकीय महाविद्यालयासाठी मौजे बळसोंड व सावा मधील खाजगी इमारत भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या वैद्यकीय महाविद्यालयासाठी ९८६ पदांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार पदभरती करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

या कार्यक्रमास विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयटीआयला भारतरत्न नानाजी देशमुख यांचे नामकरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ आक्टोबर**

हिंगोली शासकिय आय .टी. आय कॉलेजला भारतरत्न स्व. नानाजी देशमुख यांचे नावे देण्यात आले. फटाके फोडून आनंद साजरा केला.

हिंगोली येथील शासकीय आयटीआय महाविद्यालयास भारतरत्न स्व. नानाजी देशमुख यांचे नाव देण्यात आल्याची घोषणा कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आठ ऑक्टोबर रोजी जाहीर केली. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शहरातील शिवनेरी चौक अकोला बायपास येथे. फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला. हिंगोली जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले भारतरत्न स्व. नानाजी देशमुख यांचे नाव हिंगोली येथील शासकीय आयटीआय कॉलेजला देण्यात आले आहे. हिंगोलीकरांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, सुमित घिके, ऋषीकेश पोले, केशव तनपुरे, गणेश जाधव, संजय देशमुख, शशिकांत देशमुख, विकास जोजार, संजय चव्हाण, अभिषेक वानखेडे, लक्ष्मण थोरात, कान्होजी थोरात, दिलीप माने, सतिश घोरपडे, रामू थोरात, अर्जुन थोरात, राजेश मोकाटे, विशाल जिरवणकर यांच्यासह इतरांची उपस्थीती होती.

## हिंगोली दसरा महोत्सवातील रामलीलेत राम वनवासाचा प्रसंग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ आक्टोबर**



सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने येथील रामलीला मैदानावर रामलीला मंडळाच्यावतीने रामलीला सादर करण्यात येत आहे. रामायणातील विविध प्रसंगी जीवंत स्वरूपात प्रेक्षकांसमोर मध्यप्रदेशातील कलाकार मोठ्या परिश्रमाने सादर करीत आहेत. दि ८ आक्टोबर रोजी रात्री सादर करण्यात आलेल्या रामलीलामध्ये रामवनवासचा भावूक प्रसंग कलाकारांनी सादर केला. यावेळी प्रेक्षकही भावूक झाले होते.

मध्य प्रदेशातील कलाकारांनी आतापर्यंत राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांचा जन्म, सीता स्वयंवर, राम-सीता विवाह प्रसंग आदी प्रसंग मोठ्या परिश्रमाने सादर करीत आहेत. रामायणातील हुबेहुब प्रसंग प्रेक्षकांसमोर सादर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना पेटी तबला आणि गायनाद्वारे साथ मिळत आहे.

दसरा महोत्सवातील १७० वर्षापासून चालत आलेली ही परंपरा आजही पिढ्यानपिढ्या चालू आहे. रामलीला पाहण्यासाठी आजही प्रेक्षकांची गर्दी होत असते. भारतीय संस्कृती, परंपरा जपण्याचा प्रयत्न या कलाकारांच्या माध्यमातून होत आहे.

मंगळवारी रामलीला मंडळाच्या कलाकारांनी रामवनवासाचा प्रसंग सादर केला. रामसीता, लक्ष्मण-उर्मिला, भरत-मांडवी, शत्रुघ्न-श्रुतकिर्तीया नव दाम्पतीचे वैवाहीक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. राजा दशरथ श्रीरामाचा राज्याभिषेक करण्याचे ठरवितात परंतु राणी कैकयी आणि मंथरा यांच्या वादविवाद आणि तर्क विर्तकामुळे राजा दशरथकडे वचनपूर्ती करण्याची मागणी राणी कैकयी करते.

परिणामी राम, सीता, लक्ष्मण चौदा वर्षाच्या वनवासाला निधतांनाचा प्रसंग दाखवला. हा भावपूर्ण प्रसंग प्रेक्षक पाहत असतांना भावूक झाले होते. रामलीला उत्कृष्ट सादर व्हावी यासाठी मधुकर खंडागळे, विश्वास नायक, गणेश साहू, दौलत बनसोडे, गणेश बांगर यांच्या सारखे कार्यकर्ते सतत परिश्रम करीत आहेत.



**हिंगोली- राज्याचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन हे गुरूवारी हिंगोली दौऱ्यावर येणार असून येथील शासकीय विश्रामगृहात ते लोकप्रतिनिधी, व्यापारी, पत्रकार तसेच प्रतिष्ठीत लोकांशी संवाद साधणार आहेत. राज्यपालांच्या आगमनापूर्वी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून येथील शासकीय विश्रामगृहात चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला असून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पाहणी केली. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### आज राज्यपालांचा हिंगोली जिल्हा दौरा

हिंगोली- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे गुरुवार दि. १० ऑक्टोबर, २०२४ रोजी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यामध्ये गुरुवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ९.५५ वाजता जालना पोलीस मुख्यालयाच्या हेलिपॅडवरुन शासकीय हेलिकॉप्टरने हिंगोलीकडे प्रयाण. सकाळी १०.३५ वाजता हिंगोली येथील पोलीस कवायत मैदानावर आगमन व राखीव. १०.४० वाजता हेलिपॅड येथून मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण करतील. १०.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी ११ ते दुपारी १ वाजता या कालावधीत विविध अधिकारी व मान्यवरांशी भेट घेऊन संवाद साधणार आहेत. दुपारी १ ते २ वाजता ही वेळ जेवणासाठी राखीव आहे. दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथून मोटारीने पोलीस कवायत मैदानकडे प्रयाण व २.०५ वाजता पोलीस कवायत मैदान येथे आगमन व राखीव. २.१० वाजता पोलीस कवायत मैदान येथून राज्यपाल महोदयांचे शासकीय हेलिकॉप्टरने परभणीकडे प्रयाण होईल.

### युवक-युवतींसाठी वेल्डींग वर्कचे मोफत प्रशिक्षण

हिंगोली- येथील जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने विशेष घटक योजनेंतर्गत हिंगोली तालुक्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील युवक, युवतीसाठी फूड प्रोसेसिंग या विषयावर मोफत वेल्डींग वर्क प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी उमेदवार हा किमान आठवी पास असावा, त्याचे वय १८ ते ४५ वर्षादरम्यान असावे. तसेच आधार कार्ड, तीन पासपोर्ट फोटो, टीसी, मार्क मेमो, बँक पासबूक जमा करुन आपली नाव नोंदणी दि. १२ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत करावी. नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी आयोजक सुभाष बोरकर महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले यांनी केले आहे.

### दसरा महोत्सव समितीच्यावतीने सायकल स्पर्धा

हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. दसरा महोर्तसव समितीचे अध्यक्ष समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिडा विभाग तसेच दसरा महोत्सव समितीचे पदाधिकारी नियोजन करीत आहेत. दि ९ आक्टोबर रोजी येथील औद्योगिक वसाहतीतील लिंबाळा मक्ता पासून महिला व पुरूष गटाच्या तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सायकल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी हिरवी झेंडी दाखवली. यावेळी क्रिडा अधिकारी आत्माराम बोथीकर, क्रिडा शिक्षक रमेश गंगावणे, शिवाजी इंगोले, अनिल लोळेवार, रामप्रकाश व्यवहारे, संजय भुमरे, मनोहर डुरे, गजानन आडे, लतीफ पठाण, उमेश बांगर, वसीम शेख आदींची उपस्थिती होती.

## मानव विकासच्या बसचे ब्रेक फेल, चालकाच्या सतर्कतेने अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ आक्टोबर**

सेनगाव तालुक्यातील वटकळी येथे मानव विकास मिशनच्या बसचे ब्रेक फेल झाल्याने बस एका घरावर जाऊन आदळली. यामध्ये घराच्या भिंतीचे नुकसान झाले आहे. मात्र चालकाच्या सतर्कतेने बसमधील ६५ विद्यार्थीनी सुखरूप बचावल्या.

बुधवारी दि ९ आक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता हा अपघात झाला. त्यानंतर दुसऱ्या बसने विद्यार्थीनीना सेनगावकडे रवाना करण्यात आले. हिंगोली आगाराची मानव विकास मिशनची बस क्रमांक एमएच ०६-एस ८६५१ आज सकाळी हिंगोली येथून सेनगाव तालुक्यातील दाताडा खुर्द या गावी गेली होती. त्यानंतर दाताडा खुर्द, दाताडा बुद्रुक, कोळसा येथील सुमारे ६५ विद्यार्थीनीना घेऊन बस सेनगावकडे निघाली होती. सदर बस सकाळी ठीक आठ वाजण्याच्या सुमारास वटकळी गावात आली असतांना बसचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाला चांगलाच घाम फुटला. त्यातच सकाळची वेळ असल्याने शेतकरी, शेतमजूरांची शेतात सोयाबीन काढण्यासाठी जाण्याची लगबग सुरू होती. त्यामुळे गावातील रस्त्यावरही चांगली वर्दळ होती.

दरम्यान, बस पुढे न्यावी तर समोरच विद्युब खांबावर बस धडकण्याची भिती होती तर वर्दळीमुळे अनेकांना दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.या परिस्थितीत चालकाने सतर्कता दाखवत बस एका बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला. यामध्ये बसची प्रल्हाद मुंढे यांच्या घराला धडक लागली. या अपघातात घराच्या भिंतीचा काही भाग कोसळला. यामध्येच बस जागेवरच थांबली. मात्र अचानक मोठा आवाज झाल्याने गावकरी घटनास्थळी धावले. तर बसमधील विद्यार्थीनींनी भितीमुळे आरडाओरड केली.

या अपघाताची माहीती मिळाल्यानंतर सेनगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष तांबे, जमादार मारकड, जाधव यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस व गावकऱ्यांनी दुसरी बस बोलावून विद्यार्थीनींना सेनगाव येथे पाठविले. तर बस हळुवारपणे वटकळी फाटा येथे आणून उभी केली.

## नवदुर्गा उत्सवानिमित्त स्त्री शक्तीचा जागर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ आक्टोबर**



नवदुर्गा उत्सवानिमित्त स्त्री शक्तीचा जागर करुन गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंग निवडीस प्रतिबंधक अधिनियम १९९४ कायद्याचे काटेकोरपणे अंमलबजावणीसाठी येथील जिल्हा रुग्णालयातील प्रसव पश्चात कक्षामध्ये आज मंगळवार (दि.०८) रोजी जन्मलेल्या प्रथम कन्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व समाजातील जन्मलेल्या मुलींच्या आई-वडिलांचा शाल व श्रीफळ, साडी, मुलीला ड्रेस व मिठाई देऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दीपक मोरे, डॉ. बालाजी भाकरे, मेट्रन बालासाहेब चिंचकर व सहायक मेट्रन श्रीमती आशा क्षीरसागर यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तडस यांनी आजच्या दिवशी स्त्री जन्माचे महत्त्व पटवून दिले. तसेच कायद्याचे उल्लंघन करून गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यक्तीची माहिती देणाऱ्या व्यक्तीस बातमीची खातरजमा करून व त्या अनुषंगाने खटला दाखल झाल्यास राज्य शासनामार्फत एक लाख रुपये बक्षीस देण्यात येईल. माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. माहिती देण्यासाठी ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे संपर्क साधून टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५ व १०४ यावर तक्रार नोंद करावी, अशी माहिती देण्यात आली.

या प्रसंगी डॉ. अशिष अंभोरे, सोनोग्राफी कक्षातील सुजाता कदम व प्रसूती कक्षातील सिंधु गांगुर्डे व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ॲड. सुकेशिनी ढवळे यांनी केले.

## घोषणा ते निवडणुक निकाल जाहीर होण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्याचे सुक्ष्म नियोजन करावे- जिल्हाधिकारी अभिनव गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ आक्टोबर**



आगामी विधानसभा निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकारी यांनी निवडणुकीच्या घोषणेपासून ते मतदानाचा निकाल जाहीर करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाहीचे सूक्ष्म नियोजन करावे. निवडणूक कामाला प्राधान्य देऊन यामध्ये कोणताही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव यांनी दिल्या.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी श्री. गोयल बोलत होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, मंजुषा मुथा, जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पुंजाल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक आदित्य पवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजू एडके, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी जगदीश माने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, प्रशिक्षणाचे नोडल अधिकारी दीपक साबळे यांच्यासह सर्व जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात व्यापक मतदार जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. विशेषतः गत लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या गावात, मतदान केंद्रावरील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. नवीन मतदान केंद्रांची निर्मितीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे मतदान केंद्रामध्ये बदल झाला असल्यास त्या मतदान केंद्रावरील मतदारांना याबाबत माहिती द्यावी. यासाठी ग्रामसेवक, तलाठी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यावर जबाबदारी द्यावी. मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधांची उपलब्धता करून देण्याबाबत आतापासूनच पूर्वतयारी करून ठेवण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी दिल्या. विधानसभा निवडणूक प्रक्रिया शांततामय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रत्येकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. सर्व नोडल अधिकाऱ्यांनी विधानसभानिहाय आढावा बैठका आणि प्रशिक्षण घेऊन निवडणूकविषयक कामांची माहिती द्यावी. तसेच त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. निवडणूक कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कठोर कार्यवाही केली जाईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी जिल्हास्तरावरून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली व मतदानासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

भोकरदन येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या नुतन इमारतीचे भूमीपुजनसह पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण

# भोकरदनकरांना मिळणार उत्तम आरोग्य सेवा - आ. संतोष दानवे

**तभा वृत्तसेवा**

**भोकरदन । प्रतिनिधी -** भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासाठी मा.केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या माध्यमातुन २२ कोटी ५२ लक्ष रुपयांचा निधी मंजुर करुन आनला असुन सदर उपजिल्हा रुग्णालयाच्या नुतन इमारतीचा भूमीपुजन सोहळा आमदार संतोष पाटील दानवे यांच्या शुभ हस्ते बुधवार दि. ०९/१०/२०२४ रोजी मोठया उत्साहात संपन्न झाला. तसेच भोकरदन पंचायत समितीच्या ७ कोटी रुपये खर्च करुन बांधकाम करण्यात आलेल्या सर्व सोयीसुविधायुक्त सुसज्ज नुतन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पन सोहळा ही यावेळी संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे तर प्रमुख अतिथी म्हणुन सर्वश्री जि.प.सदस्य गणेशबापु फुके, भाजपा उपजिल्हाध्यक्ष राजेंद्र देशमुख, माजी जि.प.अध्यक्ष तुकाराम जाधव, मुकेश चिने, भाजपा तालुका अध्यक्ष गणेश पा.ठाले, माजी पं.स.सभापती विलासशेठ आडगांवकर, लक्ष्मण मळेकर, भानुदास सरोदे, फकिरचंदबापु इंगळे, इरफानखॉ पठाण, परमेश्वर लोखंडे, डॉ.प्रमोद कुलकर्णी, टिकाराम निमरोट, भाऊसाहेब काकडे, माजी पं.स. सभापती विनोद गावंडे, माजी पं.स.उपसभापती सुखलाल बोडखे, जि.प.सदस्य सौ.आशाताई पांडे, पं.स.सदस्य ऋषी पगारे, संतोष वाघ, गणेश लोखंडे, कैलास सहाणे, कैलास गव्हाड, भगवानराव रावळकर, नंदकुमार गिर्हे, कमलाकर साबळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलांना आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की, जालना जिल्हयामध्ये भोकरदन तालुका हा सर्वात मोठा तालुका असुन या तालुक्यामध्ये भोकरदन ग्रामीण रुग्णालय हे एकमेव रुग्णालय आहे. भोकरदन शहरासह तालुक्याची वाढती लोकसंख्या लक्षात घेता भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयालाच्या सोयीसुविधा या वाढत्या लोकसंख्येमुळे अपुऱ्या ठरत होत्या. त्यामुळे रुग्णांना परिपूर्ण सुविधा पुरविणे शक्य होत नव्हते, ही बाब विचारा घेवुन दिवसेंदिवस वाढत जाणाया लोकसंख्येला अत्यावश्यक आरोग्य सुविधा योग्य वेळी उपलब्ध व्हाव्यात म्हणुन मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मध्यमातुन मी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व आत्ताचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे भोकरदन ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन आय.सी.यु कक्षासह ५० खाटांचे सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय मंजुर करणे बाबत मागणी केली होती. सदरील मागणीला मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व आरोग्य मंत्री तान्हाजी सावंत या मंत्री महोदयांनी तातडीने प्रतिसाद देवुन मागील वर्षातच २२ कोटी ५२ लक्ष रुपयांचा निधी मंजुर केला होता. सदर उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची निवेदा प्रक्रिया पूर्ण करुन आज या रुग्णालयाच्या कामाचे भूमीपुजन करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. भोकरदन तालुक्यातील रुग्णांना अत्यावश्यक सेवेसाठी आता जालना किंवा छ.संभाजीनगर येथे जाण्याची गरज पडणार नसुन नविन उपजिल्हा रुग्णालय रुग्णांना सर्व अत्यावश्यक सेवा तातडीने भोकदन येथेच उपलब्ध करुन देईल याची याची मी खात्री देतो असे ही ते म्हणाले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, भोकरदन तालुक्यामध्ये १२५ ग्रामपंचायती असुन या १२५ ग्राम पंचायतींचा कारभार हा पंचायत समितीच्या माध्यमातुन चालवीला जातो. व त्या निमित्ताने गावागावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रासेवक व पदाधिकारी यांचा वावर हा पंचायत समितीमध्ये असतो. त्यासोबतच राज्यशासनाच्या व जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात येणाया घरकुल योजना, पाणीपुरवठा योजना, शौचालय, स्वच्छता अभियान, ग्रामपंचायतीचे विविध वित्त आयोग यासह बायाच योजनांची प्रत्यक्ष आमंलबजाणी ही पंचायत समितीच्या माध्यमातुन करण्यात येते. त्यामुळे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व पदाधिकारी व सर्वसामान्य जनता ही कायम पंचायत समितीमध्ये येत असते. परंतु भोकरदन येथे पंचायत समितीची जुनी इमारतीत पुरेशी नसल्यामुळे व पंचायत समितीचे विभाग विखुरलेले असल्यामुळे सरपंचासह नागरिकांची



मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत होती. ही बाब विचार घेवुन पंचायत समितीचे सर्व विभाग हे एकाच छताखाली काम करु शकतील अशी एक सर्व सोयीसुविधांनीयुक्त सुसज्ज प्रशासकीय इमारत भोकरदन येथे पंचायत समितीसाठी बांधणे आवश्यक होते त्यामुळे मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व ग्राम विकास मंत्री गिरीष महाजन यांच्याकडे नुतन इमारतीसाठी मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मध्यमातुन ७ कोटी रुपयांची मागणी केली होती. उक्त चारही मंत्री महोदयांनी माझ्या मागणीला तातडीने प्रतिसाद देत चार वर्षापुवीच हा निधी मंजुर केला होता. आणि मंजुर करुन आणलेल्या निधीच्या माध्यमातुन भोकरदन पंचायत समितीच्या सुसज्ज प्रशासकीय इमारत माझ्याच कार्यकाळात पूर्ण झाली असुन आज सदर इमारतीचे लोकापर्ण माझ्या हस्ते होत असतांना मला मनस्वी आनंद होत आहे. ही पंचायत समिती भोकरदन तालुक्यातील सर्व गांवाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी व ग्रामपंचायतींना सशक्त करण्यासाठी बहुउपयोगी ठरेल असा विश्वास मला आहे. ही पंचायत समतीची इमारत ही केवळ सरकारी इमारत नसुन ती स्वतःच्या कारभारासाठी बांधलेली इमारत असल्यामुळे ही सरकारी इमारत न समजता आपले स्वतःचे घर समजुन येथे येणाया सर्व सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक, कर्मचारी व सर्वसामान्य जनतेने या वास्तुची स्वच्छता व निगा राखावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्यने तालुक्यातील नागरिकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### सुरेश पवार यांच्या कडून महाआरती व धरणाकरुनं फराळाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**

**मंठा । प्रतिनिधी -** येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश पवार यांनी आ.राजेश राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत (ता.८) मंगळवार रोजी मंठा तालुक्याच्या आराध्य दैवत श्री जगदंबा देवीची महाआरती करून धरण बसलेल्या भाविकांना फराळाचे वाटप केले.

श्री जगदंबा देवी मंदिर परिसरात नवरात्र महोत्सव निमित्त मंठा तालुक्यातील व परिसरातील अनेक भाविक भक्त नऊ दिवस घटी बसत असतात व नऊ दिवस उपवास केला जातो या वेळी मंदिर परिसरात यात्रा भरवण्यात येत असते. अशा भाविक भक्तांना सुरेश पवार यांच्या वतीने फळाचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी बाजार समितीचे माजी संचालक शरद बोराडे, विजय बोराडे यांची उपस्थिती होती.

### नवरात्रोत्सवात विवेकानंद तर्फे रूग्णांची मोफत तपासणी



**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी -** शारदीय नवरात्रोत्सवा निमित्त कन्हैया नगर परिसरातील जय मॉ ग्रुप च्या वतीने महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत विवेकानंद हॉस्पिटलच्या सहकार्यातून बुधवारी ( ता. ०९) आरोग्य शिबीरात ४८ नागरिकांची तपासणी करण्यात आली. व्यवस्थापक किशोर आघाम यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभाविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. अक्षय शेळके यांनी तपासणी करून मार्गदर्शन केले. यात नवजात शिशु, लहान मुलांचे सर्व आजार, किडणी , मूत्र मार्गातील खड्यांची शस्त्रक्रिया, समुपदेशन व मार्गदर्शन ,वयोमानाप्रमाणे पुरुषाच्या मूत्रमार्गाच्या मागील गाठीची (प्रोस्टेट) शस्त्रक्रियेबाबत मार्गदर्शन, अस्थिरोग, मणक्याचे आजार, स्त्री -पुरुषांच्या कॅन्सरचे औषधोपचार,शस्त्रक्रिया, समुपदेशन व मार्गदर्शन,डायलेसिस, थायरॉईड, आतड्याचे आजारांची तपासणी करून औषध, गोळ्यांचे वाटप करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रशासकीय अधिकारी शशिराज केंढे, व्यवस्थापक रविराज केंढे, अरबाज शेख,योगेश भगत, जय मॉ ग्रुपचे अध्यक्ष प्रकाश राऊत, मनोज यादव, धनराज भगत, पदमराज भगत, शाम सुलाने, विनोद भगत ,विश्वनाथ क्षीरसागर, अमोल देशमाने, भरत भगत, शिवाजी बोंबाळे , विनोद दांडगे ,काशिनाथ साळवे यांनी परिश्रम घेतले.

### जवाहर नवोदय विद्यालयातील प्रवेशासाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी -** जवाहर नवोदय विद्यालयातील वर्ग नववी व अकरावीसाठी प्रवेश परीक्षा शनिवार दि.२५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या व इयत्ता आठवीच्या वर्गात २०२४-२५ या वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सेवा केंद्रावरुन किंवा इतर ठिकाणावरुन ऑनलाईन अर्ज https://cbseitms.nic.in/ या संकेतस्थळावर बुधवार दि.३० ऑक्टोबर, २०२४ पर्यंत सादर करावेत.

# गांधी चमन रेल्वे स्टेशन सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट!

## चौकशी करून, दोषींवर कारवाई करा - अमरदीप शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी -**

जालना शहरातील गांधी चमन ते रेल्वे स्टेशन सिंमेट रस्त्याचे काम निकृष्ट झाले आहे. या रस्त्याच्या कामाची गुण नियंत्रण विभागाकडून चाचणी करून तात्काळ पाहाणी करण्यात यावी व दोषी ठेकेदार व संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करावी नसता आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अखिल भारतीय माळी महासंघाचे माळी महासंघाचे जिल्हा संघटक अमरदिप शिंदे यांनी दिला आहे. याबाबत जिल्हाधिकारी जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना शहरातील गांधीचमन ते रेल्वे स्टेशन दरम्यान झालेल्या सिमेंट रस्त्याचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असुन रस्त्याच्या दोन्हीही बाजुला पाथवे पायी जाण्या- येण्याच्या रस्त्यावर





बसविण्यात आलेले गट्टू हे काही ठिकाणी टाकलेले असुन उर्वरित ठिकाणी अद्यापही गट्टू लावलेले नाहीत. तसेच रस्त्याच्या मधोमध विज वितरण कंपनीचे जुने उभे असलेले खांब जशास तसे ठेवलेले असल्यामुळे अपघात होवून दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच रस्त्याच्च्या मध्यभागी डिव्हायडर बसविण्यासाठी व वृक्षारोपण करण्यासाठी उभारण्यात डिव्हायडरची रचना अद्यापही करण्यात आलेली नाही. सदरील रस्त्याचे काम अपुर्ण अवस्थेत आहे. या रस्त्याच्या कामात करोडो रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. व रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. सदरील रस्त्याच्या कामाची चौकशी करून, संबंधीत ठेकेदाराविरूध्द कारवाई करावी व रस्ता दर्जेदार करावा नसता आंदोलन करण्याचा इशारा निवेदनावर दिला आहे.

निवेदनावर माळी महासंघाचे माळी महासंघाचे जिल्हा संघटक अमरदिप शिंदे यांच्यासह किशन राऊत, गजानन गडकरी, शिवाजीराव घायाळ, निलेश वानखेडे, बबनराव जाधव, सोपान राऊत, बाबुराव जेवळ, रमेश वानखेडे, शरद वानखडे, सचिन वानखेडे, संतोष राऊत, अरूण जाधव, राजु तिडके, विलास राऊत, प्रल्हाद गडकरी, बंडु जाधव, सागर पवार, गजानन सुपेकर, ओंकार कुलकर्णी, अंकुश खरात, अनिल खरात, ज्ञानेश्वर राठोड, रमेश खांडेभराड आदिंची नावे आहे.

# डॉ. हिकमत उढाण हाती घेणार धनुष्यबाण

## घनसावंगीतून पुन्हा विधान सभेची तयारी !

**तभा वृत्तसेवा**

**घनसावंगी । प्रतिनिधी -** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदें यांच्या उपस्थितीत घनसावंगी येथे साखर कारखान्याचे उदघाटन होणार असून या प्रसंगी डॉ . हिकमत उठाण यांच्या अडीच हजार समर्थकांसह शिंदे सेनेत जाहीर प्रवेश करणार असल्याचे त्यांनी बुधवार (दि ९) रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून माहीती दिली.



घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उबाठा गटाचे नेते डॉ. हिकमत उढाण यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जवळीक वाढली. १० ऑक्टोबर रोजी त्यांच्या साखर कारखाण्यांचे दुसऱ्या यूनीट चे उद्धाटन करण्यासाठी थेठ मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे हे घनसावंगीत येत आहेत. या प्रसंगी डॉ उढाण हे शिंदे सेनेत प्रवेश करूण धनुष्य बाण हाती घेणार आहे . माजी सनदी अधिकारी असलेले डॉ. हिकमत उढाण २०१४ पासून घनसावंगी विधानसभा मतदारसंघातून नशीब आजमावत डॉ. हिकमत उढाण २०१४ मध्ये विधानसभेसाठी शिवसेनेचे उमेदवार होते तेव्हा त्यांना ४५, ५५७ मते मिळाली होती. २०१९ ला मात्र येथे डॉ. उढाण व टोपे यांच्यात सरळ लढत झाली. या वेळी उढाण यांना १ लाख ४ हजार ४४० तर टोपे यांना १ लाख ७ हजार ८४९ मते मिळाली. उढाण ३४०५ मतांनी पराभूत झाले होते. दरम्यान, उद्धव ठाकरे गट आता महाविकास आघाडीत आहे. येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राजेश टोपे हे महायुतीचे उमेदवार निश्चित असल्याने ठाकरे गटातून डॉ. उढाण यांना संधी मिळण्याची डॉ. उढाण यांनी सोमवारी घनसावंगी येथील आपल्या कार्यालयात समर्थकांची बैठक बोलावली होती. या वेळी कार्यकर्त्यांनी त्यांना निवडणूक लढविण्याची मागणी केली, परंतु उद्धव ठाकरे गट महाविकास आघाडीसोबत असल्याने शिंदे गटातून उमेदवारी घेण्याची मागणी कार्यकर्त्यांनी केली.

# भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघात इच्छुकांची भाऊ गर्दी

## यंदा कोणकोण उतरणार निवडणुकीच्या मैदानात? दोन्ही दानवे मध्ये लढत होण्याची मतदारसंघामध्ये चर्चा?

**तभा वृत्तसेवा**

**जाफराबाद । मुकेश भारद्वाज -** भाजपचा बालेकिल्ला समजला जाणारा भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघाला लोकसभा निवडणुकीत सुरुंग लागला आहे. विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत. मराठा, आरक्षणामुळे सत्ता बदलाचे वारे वाहत असल्याचे भोकरदन विधानसभा महाविकास आघाडीतील नेत्यांना वाटत आहे.

### गेल्यावेळी चंद्रकांत दानवेंचा ३१ हजार मतांनी झाला होता पराभव

संतोष दानवे यांना विधान सभेच्या निवडणुकीत पराभूत करण्यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील विविध पदाधिकारी आमदारकी साठी मराठा आरक्षणामुळे दावे करीत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी आमदार चंद्रकात दानवे पक्षाकडून आणखी एकदा संधी मिळेल, अशी चर्चा आहे. २०१९ च्या निवडणुकीत ३१ हजार मतांनी चंद्रकांत दानवेंचा पराभव झाला होता.

आमदार संतोष दानवे व माजी आमदार चंद्रकांत दानवे यांचेच या भागावर प्राबल्य राहिलेले आहे.

गेल्या दहा वर्षांपासून भाजपचे संतोष दानवे या विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करीत आहे. त्यांना शह देण्यासाठी तालुक्यात महाविकास आघाडी जरी एकजुटीने असले तरी त्यांचा पराभव करणे पाहिजे तितके सोपे ठरणार नाही.

भोकरदन,जाफराबाद विधानसभा मतदार संघातील गावगांवात जावून शेतकरी कामगार सर्वसामान्य यासह कार्यकत्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. त्यांनी भेटीगाठीवर जोर दिला आहे. महाविकास आघाडीमध्ये इच्छुकांची गर्दी वाढत असली तरी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या बाबत पक्ष काय निर्णय घेतो, यावरही जाफराबाद तालुक्यातील उमेदवाराचा निर्णय होऊ शकतो. तर जाफराबादच्या नगराध्यक्षा तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला जिल्हाध्यक्षा डॉ. सुरेखा लहाने यांच्या घरी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही महिन्याआधी भेट देऊन त्यांच्याशी हितगुज केली होती. आणि सुप्रिया सूळे(पवार) यांचे जवळचे संबंध असल्याचे बोलले जात आहे. यामुळे डॉ.सुरेखा लहाने यांच्या आमदारकीच्या अपेक्षा उंचावलेल्या आहे. त्या दृष्टीने त्यांनी वर्षभरापासून कामही सुरू केले आहे. विविध ठिकाणी भेटीगाठी घेऊन पक्षाने तिकीट दिल्यास आपण आमदारकी

लढविण्यास तयार आहे असे बोलले जात आहे. त्यांचेही भावी आमदार म्हणून बॅनर झळकत आहे .तसेच कल्याण काळे निवडून आल्यामुळे कॉग्रेस चेही वातावरण चागले दिसत आहे कॉग्रेस मधून पर्यावरण विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश गवळी हे सुध्दा इच्छुक आहे,पक्षाने

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष यांची तर विधानसभेची पक्षातर्फे उमेदवारी निश्चित झाली आहे. यांनी शेतकऱ्यांसाठी आंदोलन आणि उपोषण सुद्धा केलेले आहे.



तिकीट दिल्यास निश्चितच निवडुन लढणार असे त्यांनी सांगितले आहे.त्यांनी तर अगोदर कॉग्रेसचे जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या कडे उमेदवारी साठी अर्ज सुद्धा केलेला आहे. तसेच स्वतः राजाभाऊ देशमुख हे सुद्धा भावी आमदार म्हणून इच्छुक आहे . राजाभाऊ देशमुख यांनी दोन्ही तालुक्यात संपर्क कार्यालय स्थापन केले आहे. त्यांचे दोन्ही तालुक्यात भावी आमदार म्हणुन बॅनर झळकू लागले. जाफराबाद तालुक्यातील शिवसेना उबाठाचे रमेश गव्हाड यांनी साल २०१४ च्या

विधानसभा निवडणुकीत ३६ हजार २९८ मते घेतले होते त्यांनी तर दोन्ही तालुक्यात आपला हक्काचा माणूस म्हणून बॅनर झळकत आहे.तसेच उबाठाचे मनीष श्रीवास्तव, लोकजागर चे केशव जंजाळ हे सुद्धा इच्छुक आहे असे बोलले जाते आहे.

## सोयगाव परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस

# वरखेडी शिवारात दहा हजार केळी आडवी; २५ लाखांचे नुकसान

तभा.वृत्तसेवा
सोयगाव; दि.९ ऑक्टोबर

सोयगाव सह परिसरात सायंकाळी पाच वाजता झालेल्या वादळी वाऱ्यासह जोरदार परतीच्या पावसाने तडाखा दिला असून वादळी वाऱ्याने वरखेडी(बु) शिवारात शेतकरी प्रितमसिंग सूर्यवंशी यांच्या शेतात गट क्र-१ मध्ये दहा हजार केळी आडवी झाल्याने त्यांचे तब्बल अंदाजे २५ लाख रुचे नुकसान झाले आहे दरम्यान सायंकाळी सात वाजेपर्यंत पाऊस सुरूच होता सावळदबारा मंडळात सलग दोन तास मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे विजांच्या कडकडाटात झालेल्या मुसळधार पावसाने सावळदबारा मंडळात कापूस भिजून नुकसान झाले आहे. दरम्यान सोयगाव परिसरात कंकराळा, जरंडी, माळेगाव, पिंपरी, निंबायती, बहु लखेडा, कवली, तिखी, उमर विहिरे, निमखेडी, घोसला आदी भागात अर्ध्या तास जोरदार पावसाने हजेरी लावली आहे दरम्यान शेतात वेचणी केलेला कापूस भिजून नुकसान झाले आहे वादळी वाऱ्याने वरखेडी बु शिवारात दहा हजार केळीचे झाडे घडा सह आडवे झाली आहे त्यामुळे शेतकरी प्रीतम सिंग सूर्यवंशी यांचे २५ लक्ष रु चे नुकसान झाले आहे दरम्यान सोयगाव परिसरात झालेल्या जोरदार पावसाने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली होती सावळदबारा मंडळात दोन तास वादळी वारे सुरू होते त्यामुळे या भागाला नुकसानीची मोठा फटका बसला आहे या भागात चार वाजता सुरू झालेल्या मुसळधार परतीच्या पावसाने सायंकाळी साडेसहा वाजता उघडीप दिली होती.



# आ. मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समिती दुर्गा माता मंदिर भूमिपूजन व सुसज्ज उद्यानाचे उद्घाटन

जिंतूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधरराव बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून कृ.उ.बा. समिती मार्केट यार्ड मध्ये श्री दुर्गामाता मंदिर भूमिपूजन व सुसज्ज निसर्गरम्य गणाचे उद्घाटन आ. मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते पार पडले.



कृ.उ.बा. समिती मधील मार्केट यार्ड च्या पाठीमागील बाभळीबंद ची जागा सुसज्ज करून त्या ठिकाणी उभारण्याची संकल्पना आमदार मेघना बोर्डीकर यांनी मागच्या वर्षी मानली होती त्या संकल्पनेतून आज परिपूर्ण निसर्गरम्य उद्यान बनवून त्याचे लोकार्पण आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले या उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी ट्रॅक बनवण्यात आला आहे व तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी विविध साहित्य उपलब्ध करण्यात आले आहे व ओपन जिम सुद्धा उभारण्यात आली आहे. या ठिकाणी शहरी व ग्रामीण भागातील येणाऱ्या शेतकरी व नागरिकांना याचा फायदा होणार आहे या कार्यक्रमाच्या प्रसंगी आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते ग्रामीण भागातील महिलांना साडी वाटप करण्यात आली. या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधरराव बोर्डीकर यांच्यासह संदीप भैय्या शर्मा महाराज, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, कृषी उत्पन्न बाजार संचालक राजू देवकर ,नामदेव मोहिते, गंगाधरराव कांबळे, उपसभापती सुंदरराव नाईक, प्रदीप चव्हाण, रमण तोष्णीवाल, संजय कोकडवार ,गणेश कुऱ्हे ,दत्ता कटारे, गोविंद दायमा ,राहुल देशमुख ,गोविंद थिटे ,आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते .

## श्रीराम फायनान्सचे टू-व्हिलर लोन व्हाउचर लॉन्च

संभाजीनगर, ०९ ऑक्टोबर : श्रीराम समुहाची प्रमुख कंपनी असलेल्या श्रीराम फायनान्स लिमिटेडने आज टू-व्हीलर लोन एलिजिबिलिटी व्हाउचर योजनेचा शुभारंभ करत असल्याची घोषणा केली. येणाऱ्या सणासुदीच्या काळात आपल्या पसंतीची दुचाकी खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी टू-व्हीलर कर्जासाठी हा एक नाविन्यपूर्ण आणि अशा प्रकारचा पहिलाच वित्तपर्याय उपक्रम आहे.



**बालज्ञान मंदिर सातारा परिसर येथील शाळेमध्ये शारदा महोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी पालकांसह शाळेच्या मुख्याध्यापिका सोनाली पाटील, त्रिशाला थोरात,यांच्यासह शिक्षक दिसत आहेत.**

## सिल्लोड सोयगाव मतदार संघातील ओबीशीची मतदारामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्यात दादाराव आळने याचे तारेवरची कसरत दादाराव आळंने याच्या संपर्क दौऱ्याला प्रतिसाद



सिल्लोड प्रतिनिधी - गाव भेट कार्यकर्ता संपर्क दौरा यंदा हिंदू ओबीसी आमदार होणारच सिल्लोड विधानसभेच्या ८० हजार ओबीसी मतदारांना हिंदू ओबीसी आमदार म्हणून एका छोट्याशा वांजोळा गावातून आलेले उच्चशिक्षित व्यक्तिमत्व व गोरगरीब जनतेचे काम करणारे सर्वांना समान न्याय मिळवून देणारे सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणारे मतदारसंघांमध्ये दांडगा संपर्क असलेले भारतीय जनता पार्टीचे ओबीसी मोर्चाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य एडवोकेट दादाराव आळणे यांना पाहण्याची अपेक्षा गाव भेटीत मतदारांनी व्यक्त केली आहे सिल्लोड शहर विधानसभा मतदारसंघांमधून आजपर्यंत एकही ओबीसी आमदार निवडून गेलेला नाही यावेळेस परिवर्तन करून हिंदू ओबीसी आमदार झाला पाहिजेत अशा अपेक्षा गावागावात ओबीसी बांधवांमध्ये तसेच एससी एसटी बांधवांमध्ये जागृत झाले आहे एससी एसटी ओबीसी बांधव एक गठ्ठा मतदान झाल्यास एडवोकेट दादाराव आळणे यांचा १००% विजयी होऊ शकतो व ओबीसी आमदार होणे अटळ आहे अशी चर्चा गावागावांमध्ये होताना दिसत आहे .

## गो शाळेच्या चाऱ्यासाठी दानशुरांनी पुढे यावे -काका महाराज

प्रतिनिधी/सोनपेठ - तालुक्यातील सायखेडा येथे अस्तित्वात असलेल्या जय श्रीराम गोशाळेमध्ये शेकडो गाईंना सांभाळले जात आहे. प्रत्येक वर्षी या गाईंच्या चाऱ्यांचा प्रश्न गो शाळेच्या व्यवस्थापकांना भेडसावत असतो. त्यातच कत्तलखान्याकडे जात असलेल्या ५० बैलांना पालम पोलिसांनी पकडून याच गो शाळेत आणून सोडले आहे. त्यामुळे गो शाळेतील गाय, बैलांच्या संकेत वाढ झाल्याने पुन्हा एकदा चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून गो भक्तांनी चाऱ्यासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन गोशाळा चालक हभप काका महाराज कदम यांनी केले आहे.

सोनपेठ तालुक्यातील सायखेडा येथे जय श्रीराम गोशाळा सुरू करुन येथील हभप काका महाराज कदम हे गो सेवा करत आहेत. सध्या या गोशाळेमध्ये लहान-मोठ्या २५० पेक्षा जास्त गाई आहेत. या गुरांसाठी दररोज किमान तीन टन चाऱ्याची आवश्यकता असते. ती भागविण्यासाठी कदम महाराज ही मोठी तारेवरची कसरत करत आहेत. त्यातच २१ सप्टेंबर रोजी कत्तल खाण्यासाठी घेऊन जात असलेल्या ५० बैलांचा टेम्पो पालम पोलिसांनी पकडला. या टेम्पोमध्ये पकडलेल्या बैलांची सुटका करून त्यांच्या पुढील देखभालीसाठी सायखेडा येथील जय श्रीराम गोशाळेमध्ये ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या गो शाळेवर पुन्हा एकदा गुरांच्या पन्नास बैलांच्या चाऱ्याची भर पडली आहे. गो शाळेतील या गाई बैलांच्या कडबा,सोयाबीन गुळी,ऊस,कडूळ,मका किंवा रोख रक्कम देऊन चाऱ्याची गरज भागविण्यासाठी दानशूर गो भक्तांनी पुढे येऊन मदत करण्याचे आवाहन काका महाराज कदम यांनी केले आहे.

## पूर्णा तालुका तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी मंडळ अधिकारी के.पी. शिंदे यांची निवड



पुर्णा,प्रतिनिधी/- येथील तहसील कार्यालयात पूर्णा तालुका तलाठी संघटनेची निवड करण्यासाठी तालुक्यातील सर्व तलाठ्यांची बैठक नुकतीच घेण्यात अली. या बैठकीत पुर्णा तालूका तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी मंडळ अधिकारी के.पी.शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी राजश्री प्रभाकर देसाई, सचिव कल्याण घोंगडे, कार्याध्यक्षपदी तलाठी गणेश गोरे यांची निवड करण्यात आली आहे. तलाठी संघटनेची नुकतीच एक बैठक जिल्हा प्रतिनिधी चिकाटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली आहे.अध्यक्षपदी मंडळ अधिकारी के.पी.शिंदे.,सचिवपदी कल्याण धोंगडे, उपाध्यक्षपदी राजश्री देसाई तर कार्याध्यक्षपदी गणेश गोरे,संघटक म्हणून बालाजी लटपटे,महिला प्रतिनिधी सुनीता चेटले,मेहराज पठाण,कोषाध्यक्षपदी अंकुश राठोड,सल्लागार म्हणून सुदाम खुणे आदीची निवड करण्यात आली आहे.सुत्रसंचलन शिवप्रसाद देवणे यांनी केले तर आभार गणेश गोरे यांनी मानले.

## आश्राबाई गायके यांचे निधन



सेलू:तालुक्यातील साळेगाव येथील रहिवाशी आश्राबाई बाबासाहेब गायके (८० वर्ष)यांचे अल्पशा आजाराने मंगळवार ८ रोजी निधन झाले.त्यांच्यावर साळेगाव येथे बूधवार ९ रोजी अत्यंसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पाश्चात पती,मूले मुली , नातवंडे असा परिवार असून ते साळेगावचे सरपंच लक्ष्मण गायके यांच्या मातोश्री होत.





"दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा, कनेक्टिव्हीटी, उत्पादकता, शाश्वत उपाय आणि सुरक्षा या सर्वाची हमी देणाऱ्या अत्याधुनिक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी आमचे सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे."
**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

**भूमिपूजन समारंभ**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ बी वरील २L+PS देवगाव फाटा - डिग्रस फाटा - सेलू - बोरगव्हाण - पाथरी - पोहनेर फाटा - सोनपेठ - इंजेगाव (धामोनी) मध्ये रस्ता सुधारणा.
लांबी : ७१ कि. मी. । किंमत : रु. ७६२ कोटी

राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ के वरील २L गंगाखेड - किनगाव मध्ये रस्ता सुधारणा.
लांबी : ३४ कि. मी. । किंमत : रु. १६३ कोटी

**लोकार्पण समारंभ**

राज्य मार्ग क्र. ४३४ वर गोदावरी नदीवर मोठा पूल बांधणे
लांबी : ३२३ मी. । किंमत : रु. ३८ कोटी

**प्रकल्पांचे फायदे**

- गंगाखेड येथील संत जनाबाई जन्मस्थान देवस्थानास जोडणारा महत्वाचा पुल.
- गोदावरी मोठ्या पुलाच्या बाजूस बांधलेल्या बंधा-यात कायमस्वरुपी २.५ TMC पाणी साठवणूक होणार आहे.
- पाथरी येथील शिर्डी साईबाबांचे जन्म स्थान असलेल्या मंदिराशी जोडणी.
- परळी वैद्यनाथ या ज्योतिर्लिंग धार्मिक स्थळास जोडणारा महत्वाचा महामार्ग.
- ओद्योगीक आणि कृषी विकासावर मोठा भर. विभागीय मुख्यालय छत्रपती संभाजनगर ला जोडणी.
- एकुणच आर्थिक विकास व रोजगार निर्माती. कृषी आणि औद्योगीक उत्पादनाच्या निर्यातीला चालना.
- सुरक्षीत वाहतूक करणे शक्य. शाश्वत विकासासह उत्तम गतीशीलता.
- साखर उद्योगासाठी फायदेशीर. वेळेची व इंधनाची बचत.

**सकाळी ११ वाजता, गुरुवार, १० ऑक्टोबर, २०२४ | दत्त मंदिर मैदान, गंगाखेड - ४३१ ५१४.**

शुभहस्ते
**नितीन गडकरी**
केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार

प्रमुख उपस्थिती

**गिरीष महाजन** – मंत्री, वैद्यकीय शिक्षण आणि पालकमंत्री, लातूर
**संजय बनसोडे** – मंत्री, क्रिडा आणि युवक कल्याण बंदरे विकास तथा पालकमंत्री, परभणी

सन्माननीय अतिथी

**डॉ. फौजिया खान** – राज्यसभा सदस्य
**संजय ऊर्फ बंडू जाधव** – खासदार, लोकसभा सदस्य (परभणी)
**डॉ. शिवाजी काळगे** – खासदार, लोकसभा सदस्य (लातूर)
**सतीश चव्हाण** – आमदार, विधान परिषद सदस्य
**विक्रम काळे** – आमदार, विधान परिषद सदस्य
**रमेश कराड** – आमदार, विधान परिषद सदस्य
**राजेश विटेकर** – आमदार, विधान परिषद सदस्य
**सुरेश वरपुडकर** – आमदार, विधानसभा सदस्य (पाथरी)
**बाबासाहेब पाटील** – आमदार, विधानसभा सदस्य (अहमदपूर-चाकूर)
**डॉ. राहुल पाटील** – आमदार, विधानसभा सदस्य (परभणी)
**रत्नाकर गुट्टे** – आमदार, विधानसभा सदस्य (गंगाखेड)
**मेघनाताई बोर्डीकर** – आमदार, विधानसभा सदस्य (जिंतूर)

www.morth.nic.in
www.nhai.gov.in
www.facebook.com/MoRTHIndia
www.facebook.com/NHAISocialmedia
www.twitter.com/MoRTHIndia
www.twitter.com/NHAISocialmedia